# पंढरी संचार

● पंढरपूर ● गुरुवार, ५ डिसेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | ● वर्ष २९ ● अंक - १९५




आ. राजू खरे यांच्या आई-वडिलांचा सन्मान
PII



एनआयटी कॉम्प्युटरच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा
PIII

# मी पुन्हा आलो!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत ऐतिहासिक शपथविधी




■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आज गुरुवारी शपथ घेणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांची 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन ही घोषणा चांगलीच प्रसिद्ध झाली होती. डिसेंबर २०१९ मध्ये विरोधी पक्षनेते असताना फडणवीस यांनी सभागृहात भाषण करताना मुख्यमंत्रीपदी परत येण्याचे आश्वासन दिले होते. तत्कालीन सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारमधील अनेकांनी फडणवीस यांची अनेकदा खिल्लीही उडत त्यांना सोशल मिडीयावर देखील ट्रोल करण्यात आले होते, परंतु तोच शब्द आज खरा ठरत आहे. देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी महाराष्ट्र भाजप विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. भाजपच्या कोअर कमिटीने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केल्याने त्यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अनेक मान्यवर या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.
महाराष्ट्राच्या नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. ते राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. ५ डिसेंबर रोजी हा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. फडणवीस » पान ३ वर

आम्ही राज्यपालांना भेटून राज्यात सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी पाठिंब्याचे पत्र दिले आहे. राज्यपालांनी आम्हाला उद्या संध्याकाळी 5.30 वाजता शपथविधीसाठी आमंत्रित केले आहे. आमच्या युतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मला महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ देण्याची विनंती राज्यपालांना केली आहे. राज्यपालांनी सर्व विनंत्या मान्य केल्या आणि आज संध्याकाळी 5.30 वाजता शपथविधीसाठी आम्हाला आमंत्रित केले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ही पदे ही केवळ तांत्रिक पदे आहेत. महाराष्ट्रासाठी आपण सर्व मिळून काम करू. आगामी बैठकीत मंत्र्यांबाबत निर्णय घेतला जाईल.
— देवेंद्र फडणवीस

### कॉरिडॉरवर अर्थमंत्र्यांचा शिक्कामोर्तब



भारताला नुकत्याच झालेल्या महाराष्ट्राच्या निवडणुकीतील भाजपाच्या यशाने एक स्पष्ट संदेश दिला आहे आणि तो संदेश आहे विकसित भारताचा. यापुर्वी महाराष्ट्रात आणि मुंबईत विकासाच्या योजना कृतीत उतरवल्या गेल्या. पण दुर्दैवानी विरोधकांनी त्यात अडथळे आणून त्या थांबविण्याचा प्रयत्न केला. पण महाराष्ट्रातील मतदारांनी उत्साहाने पुढे येऊन काँग्रेसच्या अडथळ्याला दूर केले आणि महायुतीला भरघोष यश मिळवून दिले. मुंबई देशाची आार्थिक राजधानी आहे. म्हणून इथला विकास प्रगतीपथावर युती शासनाने आणल्याचे दिसून येते. आषाढी एकादशी दिवशी लाखो भाविक पंढरपूरला दर्शनाला येत असतात त्यांना योग्य त्या सुख-सोयी उपलब्ध होण्यासाठी कॉरिडॉरची कल्पना प्रत्यक्षात उतरविली गेली पाहिजे. जेणेकरुन वारकऱ्यांच्या सोयी आणि सवलती चांगल्या प्रकाराने होतील असे मत आज विधीमंडळाच्या सेंट्रल हॉलमध्ये गटनेता पदाच्या निवडीच्या बैठकीत प्रमुख केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सितारामन् यांनी व्यक्त केले. त्याला उपस्थित आमदारांनी टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अप्रत्यक्ष सुचनेवरुन आता नियोजित कॉरिडॉर होणार हे अधोरेखित होताना दिसते.

## At a Glance

### वाहतुकीचे नियम मोडलेल्या सात हजार जणांना नोटीसा



**सोलापूर :** वाहतुकीचे नियम मोडलेल्या सात हजार जणांना मोबाईलवर नोटीसा पाठवल्या असून दंड भरण्यासाठी त्यांना लोक अदालतीमध्ये हजर राहण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यानंतरही वाहन चालक, मालकांनी प्रतिसाद दिला नाही तर वॉरंट निघण्याची शक्यता सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक सुधीर खीरडकर यांनी व्यक्त केली आहे. नोटीस पाठवूनही संबंधितांनी दंडाची रक्कम भरली नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या मोबाईलवर नोटीस पाठवून येत्या 14 डिसेंबरला सोलापुरात होणाऱ्या लोक अदालतीमध्ये उपस्थित राहून दंड भरण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### पवनचक्कीचे साहित्य नेत असलेल्या कंटेनरला धडक




**सोलापूर :** भरधाव वेगातील एसटीच्या चालकाने पवनचक्कीचे साहित्य घेऊन जात असलेल्या कंटेनरला जोराची धडक दिली. या धडकेत तीन लाख रुपयांच्या पवनचक्कीच्या साहित्याचे नुकसान झाले आहे. हा अपघात सोलापूर विजयपूर महामार्गावर बसवनगर, तेरामैल ब्रिजवरील (तालुका दक्षिण सोलापूर) हद्दीत घडला. इलियास इस्लाम खान (वय 46 राहणार चेंबूर, वाशी नाका, मुंबई) यांनी मंद्रूप पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून कर्नाटक राज्याच्या केए 28 एफ 2388 या बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या अपघाताचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आसादे हे करीत आहेत.

### पिकअप उलटून शेतकऱ्यांचा मृत्यू




**मंगळवेढा :** कांदा भरून मार्केटला निघालेल्या पिकअपचे पाठीमागील चाक अचानक निखळून पिकअप जीप उलटी झाली. या अपघातात कांदा उत्पादक शेतकरी जागीच ठार झाला आहे, तर एकजण गंभीर जखमी झाला आहे, तर अन्य दोघे किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर सांगोल्यातील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सांगोला-मंगळवेढा हायवेवरील एका हॉटेलजवळ हा घडला. पृथ्वीराज ज्ञानोबा गोडसे (वय 54, रा. मल्लेवाडी, ता. मंगळवेढा) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे, तर समाधान घोडके (रा. मल्लेवाडी, ता. मंगळवेढा), असे जखमीचे नाव आहे.

### मा.आ.जगताप अजित पवारांच्या गटात

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे यश मिळत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील माजी आमदार राहुल जगताप लवकरच अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. श्रीगोंदा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार राहुल जगताप यांची निवडणूक हरवल्यानंतर अजित पवार यांच्यासोबत बैठक झाली आहे. मंत्रिमंडळ विस्तारानंतर ते अधिकृतपणे पक्षप्रवेश करणार असल्याचे वृत्त आहे.

## पाच वर्षांपासून मंदिर समितीचा अध्यक्षाविना कारभार;नवीन मंदिर समिती नियुक्तीकडे लक्ष

■ **दत्तात्रेय खटवटे**

**पंढरपूर :** सन 2019 रोजीच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने उमेदवारी दिल्यामुळे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे अध्यक्ष अतुल भोसले यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. यानंतर शासनाने नवीन अध्यक्षाची निवड केली नाही. यामुळे गेल्या पाच वर्षापासून मंदिर समितीचा कारभार अध्यक्षाविना सुरू आहे. मंदिर समितीची मुदत संपली असल्यामुळे नवीन मंदिर समिती नियुक्त करण्यात यावी अशी मागणी होत आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटी होऊन अधिक भाविक येतात. यामुळे येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी शासनाने विठ्ठल रुक्मिणी



मंदिर समितीची स्थापना केली आहे. या मंदिर समितीवर राज्यात भाजपची सत्ता असताना अध्यक्ष म्हणून अतुल भोसले यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच नवीन मंदिर समिती जाहीर करण्यात आली होती. अध्यक्ष अतुल भोसले यांनी पंढरीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ व थंडगार पाणी मिळावे यासाठी शहरात अनेक ठिकाणी वॉटर एटीएम उभारले होते. यामुळे याचा फायदा भाविकांना झाला होता. तसेच विविध कामे करून त्यांनी भाविकांना सुविधा दिल्या होत्या. यामुळे भोसले यांच्या कामाबाबत भाविकातून समाधान व्यक्त होत होते. सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने अतुल भोसले यांना उमेदवारी दिली. यामुळे अतुल भोसले यांनी मंदिर समिती अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. यानंतर मंदिर समितीचा कारभार सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर पाहू लागले. गेल्या पाच वर्षापासून अवसेकर महाराज मंदिर समितीचे काम पाहत आहेत. अध्यक्षाविना पाच वर्षापासून मंदिर समितीचा कारभार सुरू आहे. मंदिर समितीची मुदत संपून तीन वर्षाहून अधिक काळ उलटला आहे. मात्र तरीही शासनाने नवीन मंदिर समिती जाहीर केली नाही. राज्यात महायुतीची सत्ता आहे. यामुळे मंदिर समितीवर वर्णी लागावी म्हणून तिन्ही पक्षातील » पान ३ वर



### स्थानिक निवडणुकांमध्ये पालकमंत्री निर्णायक

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**सोलापूर :** आगामी काळात महापालिका, जिल्हा परिषदांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. तत्पूर्वी, विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवाराचा प्रचार करताना आपल्याला पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत चांगली संधी मिळेल, या आशेने सर्वांनीच काम केले. सोलापूरला स्थानिक पालकमंत्री आवश्यक आहे. सध्या खासदार धैर्यशील मोहिते-पाटील हे आपल्या नेतृत्वात माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस येथील आमदारांच्या मदतीने मिनी मंत्रालयावर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवण्याचे नियोजन करीत आहेत.

## सोलापूर पालकमंत्री पदी कोणाची वर्णी लागणार?

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पंढरपूर :** नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या गुरुवारी होणार आहे. यामुळे सोलापूर पालकमंत्री पदी कोणाची वर्णी लागणार याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. पालकमंत्री पदाच्या शर्यतीत आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कलशेट्टी यांच्या नावाची चर्चा होत आहे.
राज्यात तीन वर्षांपूर्वी महायुतीची सत्ता आल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील आमदारांना पालकमंत्र्यांची संधी मिळाली नाही. यामुळे आमदारांमधून नाराजी व्यक्त होत होती. इतर जिल्ह्यातील पालकमंत्री असल्यामुळे त्यांनी सोलापूर जिल्ह्याकडे दुर्लक्ष केले. यामुळे म्हणावा तसा विकास झाला नाही त्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कलशेट्टी हे भाजपचे तीन उमेदवार विजयी झाले आहेत. नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या गुरुवारी होणार आहे. या कार्यक्रमास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद मिळणार का याकडे लक्ष लागले आहे. मंत्रीपदाच्या शर्यतीत आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कलशेट्टी यांच्या नावाची चर्चा होत आहे.

## लोकसभेनंतर विधानसभेत भाजपचे जोरदार कमबॅक

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. मात्र, त्यानंतरच्या ४ राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने मोठे यश मिळवले आहे. हरियाणा आणि महाराष्ट्रात भाजपचा मुख्यमंत्री झाला आहे. त्यासोबतच जम्मू-काश्मीर आणि झारखंडमध्येही पक्षाने चांगली कामगिरी केली आहे. यामुळे आता भाजप देशभरातील सुमारे डझनभराहून अधिक मुख्यमंत्री झाले आहेत. तर १८ राज्यांमध्ये भाजप सत्तेत आहे.
देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा मुख्यमंत्रीपदासाठी झाली असून, आता महाराष्ट्रातही भाजप सत्तेत आणि भाजपचा मुख्यमंत्री असेल. महाराष्ट्राच्या अगोदर झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीतही भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळे नायब सिंह सैनी यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यात आले. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर गेल्यावर्षी मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या राज्यांमध्ये निवडणुका झाल्या. या तिन्ही राज्यांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले त्यामुळे तिन्ही राज्यांची सत्ता आणि मुख्यमंत्री भाजपचे आहेत. मोहन यादव मध्य प्रदेशाचे, भजनलाल शर्मा राजस्थानचे तर विष्णू देव साय छत्तीसगडचे मुख्यमंत्री आहेत. यासोबत उत्तर प्रदेशात उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री आहेत. योगी आदित्यनाथ २०१७ मध्ये मुख्यमंत्री झाले आणि ते सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री आहेत. भूपेंद्र पटेल हे गुजरातचे विद्यमान मुख्यमंत्री आहेत. गुजरातमध्ये १९९८ पासून सातत्याने भाजपचे » पान ३ वर

### काँग्रेस राबविणार सह्यांची मोहीम

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**



**सोलापूर :** या पुढील काळातील देशातील सर्वच निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यासाठी पाच ते वीस डिसेंबर या कालावधीत काँग्रेस पक्षाच्या वतीने सह्यांची मोहीम राबविण्यात येणार आहे. या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने राज्यातील सर्व जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या कार्यालयांना पाठवलेल्या पत्रकात म्हटले आहे की विधानसभा निवडणुकीतील निकाल हे अविश्वसनीय आहेत. या निवडणुकीत मतांच्या टक्केवारीतील तफावत गंभीर व चिंताजनक प्रकार आहे. यामुळे ईव्हीएम संदर्भातील अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सह्यांची मोहीम राबवून जनजागृती करावी.

### सत्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** म्हैसगाव येथील श्री.संतोष (आप्पा) राऊत यांनी अभिजीत पाटील विजयी व्हावेत म्हणून तब्बल ३ महिने त्यांनी चप्पल घालणं सोडलं होतं. त्यामुळे नूतन आमदार अभिजीत पाटील यांनी त्यांचा विठ्ठलाची प्रतिमा देवून सत्कार केला आणि त्यांचे आभार मानले.

## मिनरल वॉटर चे ऑडिट होणार

# अन्न व औषध प्रशासनाचा निर्णय

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पंढरपूर :** बाटली बंद पाणी अर्थात मिनरल वॉटर पिणे आरोग्यास धोकादायक असल्याचे दिसून आले आहे. यामुळे आता अन्न व औषध प्रशासनाने बाटलीबंद पाणी उत्पादित करणाऱ्या कंपन्यांचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे बाटलीबंद पाणी तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये खळबळ उडाली आहे.
अशुद्ध पाणी आरोग्यास अपायकारक असल्याने अनेक रोग निर्माण होतात. यामुळे सध्या अनेक नागरिक बाटलीबंद पाणी पिण्याकडे कल वाढला आहे. यामुळे दिवसेंदिवस बाटलीबंद पाण्याच्या किमती वाढत आहे. दहा रुपयाला मिळणारी पाण्याची बाटली सध्या 20 ते 25 रुपये दराने



विक्री होत आहे. बाटलीबंद पाणी तयार करणाऱ्या कंपन्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र या कंपन्या पाणी कोठून आणतात. ते पाणी शुद्ध आहे का याची आत्तापर्यंत ऑडिट करण्यात आलेले नाही. बाटलीबंद पाण्यातून कोट्यावधी रुपयाची उलाढाल होत आहे. बाटलीबंद पाणी तयार करणाऱ्या अनेक कंपन्या विंधन विहीर घेऊन पाण्याचा वापर करत आहेत. यामुळे हे पाणी शुद्ध आहे की नाही याबाबत नागरिकात प्रश्न निर्माण होत आहे. बाटली बंद पाणी आरोग्यास अपायकारक असल्याचे आढळून आले आहे. यामुळे अन्न व औषध प्रशासन सतर्क झाले असून त्यांनी बाटलीबंद पाणी उत्पादित करणाऱ्या कंपन्यांचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक वर्षापासून बाटलीबंद पाणी तयार करणाऱ्या कंपन्याकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होते.मात्र आता हे पाणी आरोग्यास अपायकारक होऊ लागल्यामुळे याकडे अन्न व औषध प्रशासनाने लक्ष दिले आहे. यामुळे बाटलीबंद पाणी तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पंढरी संचार

### लाडक्या बहिणींना करावा लागतोय महागाईचा सामना

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**सोलापूर :** सप्टेंबरनंतर देशभरात महागाईने डोके वर काढले असून खाद्यतेल, कांदा, लसूण यांसह दैनंदिन वस्तूंच्या किमतींनी गृहिणींना त्रस्त केले आहे. लसणाचा भाव 300-350 रु./किलोपर्यंत पोहोचला असून, खाद्यतेलाच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. सूर्यफूल तेल 2280 रु./15 किलो तर पाम तेल 2180 रु./15 किलो झाले आहे. जालना जिल्ह्यात शेवग्याचा दर विक्रमी 500-550 रु./किलोवर गेला आहे. मात्र, पालेभाज्यांच्या किमतीत 30% घसरण झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. महागाईमुळे संसाराचा गाडा हाकणे गृहिणींना कठीण झाले असून, सरकारकडून उपाययोजनांची मागणी होतेय.

## सलग चार दिवस ढगाळ वातावरण पिके धोक्यात

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पंढरपूर :** गेल्या चार दिवसापासून सोलापूर जिल्ह्याचा ढगाळ वातावरण असल्यामुळे पिके धोक्यात आली आहेत. यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे . नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडाक्याची थंडी पडली होती. ती थंडी पिकांना लाभदायक असल्यामुळे शेतकऱ्यातून आनंद व्यक्त होत होता. मात्र गेल्या चार दिवसापासून पंढरपूर तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या वातावरणामुळे द्राक्ष गहू हरभरा पिकावर किडीचा प्रादुर्भाव होऊन उत्पादन घटण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. आणखी काही दिवस ढगाळ वातावरण राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.



हिवाळा ऋतूत पिके जोमाने येतात यामुळे उत्पादनात वाढ होते. मात्र यंदा हिवाळा ऋतूत ढगाळ वातावरण व पाऊस पडत असल्यामुळे पिकांना धोका निर्माण झाला आहे.

**सोलापूर :** सोलापूर शहर मध्ये विधानसभा मतदारसंघातील नूतन आमदार देवेंद्र कोठे यांनी आज मुंबईतील विधानभवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस अभिवादन केले. आमदार झाल्यानंतर विधानभवनातील पहिल्या दिवशी देवेंद्र कोठे हे शिवरायांच्या चरणी नतमस्तक झाले. भाजपच्या आमदारांची नवीन विधिमंडळ पक्षनेता निवडण्यासाठी आज बैठक झाली. यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. या बैठकीसाठी आमदार कोठे हे मुंबईला आले आहेत.

## मारकडवाडी मतदान प्रकरण भोवले

# आ.उत्तमराव जानकर यांच्यासह ४४ ग्रामस्थांवर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतमोजणीवर शंका घेत मारकडवाडी गावातील काही ग्रामस्थांनी आपल्या गावापुरते फेर मतदान घेण्याचा घाट घातला होता. त्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग यांनी दि. २ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२४ या दरम्यान भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मौजे मारकडवाडी या गावात जमावबंदी करण्यात आली होती. परंतु सदर गावातील ग्रामस्त यांनी मारकडवाडी गावात सकाळी 7 वाजलेपासुन सुमारे २५० ते ३०० अंदाजे लोकांचा बेकायदेशीर जमाव जमवुन बैलेट पेपरवर मतदान करण्याची प्रक्रीया राबवण्याची तयारी केली होती.

या गावात उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलुज यांचे आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था कामी महसुल नायब तहसिलदार सिद्धिनाथ विठठल जावीर यांची नेमणुक करण्यात आली होती. त्यांचे फिर्यादीवरून १) गौतम आबा माने रा. कन्हेर ता. माळशिरस, २) बाबा माने रा कन्हेर, ३) मारुती देशमुख रा माळशिरस, ४) युवराज झंजे रा मेडद ५) विष्णु नारणवर रा उंबरे दहिगाव ६) शामराव बंडगर रा तिरवंडी ७) कालिदास रुपनवर, ८) भानुदास सालगुडे रा सदाशिवनगर, ९) तुकाराम ठवरे रा खुडुस १०) बाजी माने रा कन्हेर, ११) दादा माने रा कन्हेर, १२) हनुमंत सरगर रा कचरेवाडी, १३) पांडुरंग वाघमोडे रा माळशिरस, १४) सोमनाथ पिसे रा पुरंदावडे १५) माणिक एकनाथ वाघमोडे रा माळशिरस, १६) हनुमंत ठवरे रा खुडुस, १७) तुकाराम देशमुख रा माळशिरस, १८) जावेद मुलाणी, १९) अजय सकट २०) आनंदा विष्णु मारकड रा मारकडवाडी २१) रणजित सरवदे, २२) रजनिश बनसोडे २३) साजन माने देशमुख २४) संतोष माने २५) अभिजीत साठे, २६) हनुमंत वायदंडे २७) हनुमंत भाऊ शेंडगे २८) बापु मुंगुसकर २९) स्वप्निल पवार सर्वे रा. वेळापुर ३०) स्वप्निल दत्तात्रय वाघमारे रा बागेचीवाडी अकलुज. ३१) रामा शेंडगे रा वेळापुर, ३२) बापु गायकवाड रा पिसेवाडी, ३३) बाबा तुपे रा वेळापुर, ३४) जब्बार मुलाणी रा वेळापुर, ३५) मामा पांढरे रा नातेपुते, ३६) नाथा रुपनवर रा डोंबाळवाडी, ३७) नाना शिंदे रा पिरळे, ३८) प्रकाश कदम रा कदमवाडी ३९) सुनिल भालचंद्र पाटील रा फोंडशिरस ४०) बंडु पाटील रा फॉंडशिरस ४१) संतोष सोपान वाघमोडे रा माळशिरस ४२) माऊली पाटील रा नातेपुते ४३) भिमराव नरुटे रा तामशिदवाडी ४४) विक्रम पाटील रा माळसिरस ४५) मनोज दडस रा बांगडे ४६) आप्पासाहेब देशमुख रा माळशिरस ४७) सचिन सावंत रा दहिगाव ४८) सर्जेराव जानकर रा माळशिरस ४९) संतोष देशमुख रा माळशिरस ५०) संतोष बंडगर रा खुडुस ५१) पिनु पाटील रा फोंडशिरस ५२) रोहिदास रणदिवे रा फॉंडशिरस, ५३) किसन ढोबळे रा फोंडशिरस, ५४) रामा रणदिवे रा. फोंडशिरस, ५५) दादा लाळगे रा नातेपुते ५६) वैभव दादा रणदिवे रा फोंडशिरस ५७) दिपक दादा रणदिवे रा फोडशिरस ५८) दिपक रामा रणदिवे रा फोंडशिरस, ५९) अशोक बंडगर रा पाटील वस्ती अकलुज ६०) मोहण बापुराव झंजे रा मेडद, ६१) आप्पासाहेब पंढरीनाथ वाघमोडे रा मारकडवाडी ६२) सागर तानाजी मारकड रा मारकडवाडी ६३) रामदास शिवाजी काळे रा माळशिरस ६४) समादान भाऊ भोसले रा माळशिरस ६५) जिवन बाळासाहेब देवकाते रा धानोरे वेळापुर ६६) आण्णा मारुती हाक्के रा धानोरे वेळापुर ६७) नाथा सुरेश देवकाते रा धानोरे वेळापुर ६८) काकासाहेब पांडुरंग घुले रा वटपळी माळशिरस ६९) रामभाऊ आण्णा शेंडगे रा वटपळ माळशिरस (७०) बाजी पंढरीनाथ वाघमोडे वटपळी माळशिरस ७१) हनुमंत ज्ञानेश्वर लाळगे रा नातेपुते ७२) राहुल बाबासो बंडगर रा तिरवंडी ७३) पोपट बाबुराव विर रा अकलुज ७४) शशिकांत मेघराम दिक्षीत रा अकलुज ७५) प्रविण रमेश बागल रा अकलुज ७६) संतोष बाबुराव वाघमोडे रा फॉंडशिरस ७७) योगेश नारायण ढोबळे रा फोंडशिरस ७८) संतोष लक्ष्मण वाघमोडे रा फोडशिरस ७९) सचिन मधुकर जाधव रा पुरदावडे ८०) दादा ज्ञानदेव चव्हाण रा पुरदावडे ८१) राजेश विष्णु चव्हाण रा पुरदावडे. ८२) गणेश विजय मारकड रा मारकडवाडी. ८३) सागर बिचुकले रा नातेपुते ८४) प्रेम देवकाते रा नातेपुते. ८५) राजाभाऊ रुपनवर रा एकशिव. ८६) आमदार उत्तमराव शिवदास जानकर रा वेळापुर ८७) रणजित मारकड रा मारकडवाडी. ८८) तेजस पाटील रा धर्मपुरी ८९) शहाजी बाळु वाघमोडे रा मारकडवाडी ता. माळशिरस जि. सोलापुर असे व इतर काही लोक यांचेविरूध्द बेकायदेशीर जमाव जमवुन आदेशाचा भंग केला आहे म्हणुन नातेपुते पोलीस ठाणे गु.र.नं. ३९९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम बी.एन.एस. सन २०२३ चे कलम ,१८९(१),१८९(२),१९०, २२३ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## सोलापूर महापालिकेला मिळणार 22 लाख 75 हजार रुपये



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना यापूर्वी इफ्को टोकियो इन्शुरन्स कंपनीकडून आरोग्य विमा सुविधा मिळत होती. दरम्यानच्या काळात ती बंद झाल्याने या कंपनीकडे अनामत रक्कम येणे बाकी होते. अखेर नियमित पाठपुराव्यामुळे या कंपनीकडून महापालिकेला 22 लाख 75 हजार रुपये मिळणार आहेत. या विमा कंपनीकडे असलेली महापालिकेची अनामत रक्कम परत मिळविण्यासाठी महापालिकेचे लिपिक श्रीकांत घोलप यांनी फोनवरून तसेच ईमेलद्वारे कंपनीकडे नियमित पाठपुरावा केला आहे.

## आशा डे साजरा

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** माळशिरस तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र माणकी अंतर्गत गोरडवाडी येथे १ डिसेंबर हा आशा डे म्हणून साजरा करण्यात येतो .त्याचेऔचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र फोंडशिरस येथील आरोग्य सेवक श्री रमेश बंडगर यांनी गोरडवाडीतील आशा स्वयंसेविका यांचा आशा डे निमित्त केक कापून व त्यांना गिफ्ट व गुलाब पुष्प देऊन त्यांचा मान सन्मान करण्यात आला .

## आवक घटली म्हणून लसणाचे भाव वाढले



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजारात लसणाची आवक घटली आहे. आवक घटल्याने फोडणीचा लसूण खातोय अक्षरशः काजूचे भाव वाढला आहे. सोलापूरच्या ठोक बाजारात लसणाला प्रति प्रतिक्विंटल 28 हजार ते पस्तीस हजार रुपये भाव भाव मिळत आहे. तर किरकोळ बाजारात लसनाला प्रति किलो 400 ते 600 रुपये भाव मिळत आहे. पुढच्या काही दिवसात लसणाचे भाव आणखी वाढण्याची शक्यता, फेब्रुवारी पर्यंत लसणाचे दर चढे राहणार असल्याची व्यापाऱ्यांची माहिती दिली. त्यामुळे गरीबांच्या खिशाला झळ बसणार आहे.






## आ. राजू खरे यांच्या आई-वडिलांचा सन्मान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर येथे मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार राजू खरे यांच्या आई वडिलांचा सन्मान पंढरपूर येथील जुना कराड नाका येथे स्व. महादेव भालेराव मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आला. राज्याचा नवनिर्वाचित आमदारांचे सत्कार होत असताना पंढरपुरात एक आगळा वेगळा सत्कार पार पडला. ऐतिहासिक विजय संपादन केलेले मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू खरे यांचे वडील ज्ञानू खरे व आई कांताबाई खरे यांनी खूप हालाकीच्या परिस्थितीतून वडिलांनी टांगा चालवून आपल्या मुलाला घडवले. त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा यासाठी आ.खरे यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आ.राजू खरे यांच्या आई-वडिलांनी सांगितले की अनेक दिवसांपासून त्याचे स्वप्न होते. ते पूर्ण झाले. आमचा मुलगा आमदार झाला. आम्हाला खूप आनंद झाला आहे. पुढील काळात त्याने जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करावे. जनतेची सेवा करावी. आशा भावना यावेळी व्यक्त केल्या. याप्रसंगी अण्णा ठोकळे, ऋषिकेश भालेराव, राहुल चंदनशिवे,अनिल शिवशरण, गौतम भालेराव, पोपट क्षीरसागर, दीपक साबळे, राजाभाऊ सर्वगोड, विवेकानंद रिकेबे,लालचंद ढवळे, अनिल ढवळे, संजय शिवशरण, राजू कांबळे, अशोक चव्हाण, राजू ठोकळे, पंडित ढवळे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## Selected

## एसटीचालकावर १७ दिवसांनी गुन्हा दाखल




**अक्कलकोट :** अक्कलकोट ते हन्नूर रस्त्यावर एसटी बसच्या धडकेत शेतकरी मृत झाला आहे. या घटनेत पळून गेलेल्या एसटी बसचालकाचा शोध लागला आहे. ही घटना दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत घडली आहे. त्यानंतर १७ दिवसांनी घटना उघडकीस आली आहे. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एसटीचालक राजू शिंदे (रा. चिवरी, ता. तुळजापूर) यास अटक करण्यात आली आहे. या घटनेत प्रशांत अळ्ळोळी (वय ५४, रा. अक्कलकोट मरण पावले आहेत. याबाबत मुलगा आकाश प्रशांत अळ्ळोळी यांनी फिर्याद दिली आहे.

## युवा महोत्सवातून युवक कलाकारांनी करिअर करावे



**अक्कलकोट :** शासन स्तरावरून युवकांसाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. करिअरच्या क्षेत्रा दिवसेंदिवस रुंदावत आहेत. करिअरची क्षेत्रे वाढताहेत तसे मार्ग उपलब्ध होत आहेत. मात्र त्याची निवड करताना आपल्यातील क्षमता ओळखल्या पाहिजेत. विविध सुप्तगुणांना व्यासपीठ देण्याच्या संधी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. अशा कलाकारांनी युवा महोत्सवातून करिअर करावे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी केले. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन सोलापूर येथे करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

## टेम्पोने ट्रॅक्टरला धडक दिल्याने ट्रॅक्टर चालक ठार




**मंगळवेढा :** ऊस भरून ब्राम्हपुरी मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावरून युटोपियन कारखान्याकडे निघालेल्या ट्रॅक्टरला भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने जोराची पाठीमागून धडक दिल्याने ट्रॅक्टर पलटी होऊन ट्रॅक्टर चालक अजिनाथ अशोक शिंदे (वय ३४, रा. पिंपळेची वाडी, जि. बीड) याला गंभीर जखमी करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## कुरनूर येथे नातवाने केला आजीचा खून; पोलिसांत गुन्हा दाखल



**अक्कलकोट :** वडिलांना कोणत्या दवाखान्यात उपचार करायचे, या कारणावरून आजी व नातू यांच्यात झालेल्या वादावरून नातवाने कुऱ्हाड, दगडाने मारून आजीचा खून केला आहे. ही घटना कुरनुर (ता. अक्कलकोट) येथे घडली आहे. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात निर्मला संतराव सुरवसे (वय ७०, रा. कुरनुर, ता. अक्कलकोट) मरण पावल्या आहेत.

## बार्शीत क्लबवर छापा; मोबाइलसह रोकड जप्त




**बार्शी :** बार्शी शहरातील मुळे प्लॉट येथील एका घराच्या बाजूस एका ठिकाणी तिरट नावाचा जुगार सुरू असलेल्या क्लबवर बार्शी शहर पोलिसांनी अचानक छापा टाकला. त्यात २ लाख ५५ हजाराचे ६ मोबाइल व रोख ८९ हजार ३०० रुपये असा ३ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत पोलिस उपनिरीक्षक महेश गळगटे यांनी तक्रार देताच सुधीर नाकाडे (रा. मुळे प्लॉट), सतीश हजारे (रा. पानगाव), अमोल हिंगमिरे (रा. सुभाष नगर, बार्शी), धनंजय मोरे, विजय वाघमारे (रा. सुभाषनगर), कृष्णा रजपूत (रा. सुभाषनगर) या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.







### केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

# सोलापूर जिल्ह्याला केंद्र सरकारच्या केळी निर्यात क्षेत्रात समाविष्ट करावे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** सरकारने भारतात उत्पादित विविध कृषी उत्पादनांच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी क्षेत्रीय विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. कृषी उत्पादन निर्यातासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्धतेसाठी अपेडा (APEDA) संस्थेमार्फत कृषी निर्यात कर्ज योजना जाहीर करण्यात आली आहे.

देशातील २० राज्यांमधील २३० जिल्ह्यांमध्ये ६० कृषी उत्पादनांच्या निर्यात क्षेत्रांना मान्यता देण्यात आली आहे महाराष्ट्रातील यात जळगाव, धुळे, नंदुरबार, वर्धा, परभणी, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यांना केळी निर्यात क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले आहे.

हे लक्षात घेता, सोलापूर जिल्ह्यात सध्या केळी लागवडीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले असून सुमारे १९ हजार हेक्टर क्षेत्र केळी लागवडीखाली आहे. केळी निर्यातीच्या दृष्टीने विचार करता, देशातील एकूण केळी निर्यातीपैकी ६३% निर्यात महाराष्ट्रातून होते.

यातील सुमारे ५८% निर्यात केवळ सोलापूर जिल्ह्यातून होते. मागील वर्षी महाराष्ट्रातून सुमारे ११ लाख २३ हजार ५२४ मेट्रिक टन केळी निर्यात झाली, यापैकी सुमारे ६ लाख ४८ हजार २६२ मेट्रिक टन केळी सोलापूर जिल्ह्यातून निर्यात झाली. एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत राज्यातून सुमारे २५ हजार कंटेनर केळी निर्यात झाली असून यातील १६ हजार कंटेनर सोलापूर जिल्ह्यातून निर्यात झाले आहेत ही बाबा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय मंत्री वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या लक्षात आणून देऊन सोलापूर जिल्ह्याला केंद्र सरकारच्या केळी निर्यात क्षेत्रात समाविष्ट करावे म्हणून निवेदन देऊन मागणी केली.

जिल्ह्यातील केळीची विक्रमी उत्पादन व निर्यात लक्षात घेता सोलापूर जिल्ह्याला केंद्र सरकारच्या केळी निर्यात क्षेत्रात समाविष्ट करावे, ज्यामुळे शेतकऱ्यांनी पिकवलेल्या केळींच्या गुणवत्तेत सुधारणा होऊन सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादकांना जागतिक बाजारपेठेत निर्यात संधी प्राप्त होतील खासदार धैर्यशील मोहिते-पाटील प्रयत्नशील असून याबाबत केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

**सोलापूर :** शेतजमीन आणि प्लॉट मोजणीसाठी नवीन शुल्क आकारणीची अंमलबजावणी रविवारपासून सुरू झालीये. मोजणीचे तीन प्रकार साधी, तातडीची आणि अतितातडीची ऐवजी दोन प्रकार, साधी आणि जलदगतीची मोजणी करण्यात आले आहेत. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी सर्व्हर अद्ययावत न झाल्यामुळे आणि ऑनलाइन प्रणालीमध्ये बदल केल्याने मोजणीचे अर्ज स्वीकारले जात नाहीत, अशी तक्रारी समोर येत आहेत. मोजणी अर्ज प्रक्रिया विस्कळीत झाली आहे. भूमी अभिलेख प्रशासनाने सांगितले की, सोमवारपर्यंत ही यंत्रणा सुरळीत होईल.

## हजारों रसिकांनी याला भरभरुन दिली दाद

# रयतेचा राजा शिवछत्रपती महानाट्यातून उलगडला शूरवीरांचा इतिहास

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक ०२ व ०३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा- राजा शिवछत्रपती या महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकार्यांच्या पराक्रमांचा ज्वलंत इतिहास उलगडला. हजारों रसिकांनी याला भरभरुन दाद दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज,शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने श्री विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकूल, अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुलक्षणादेवी मोहिते पाटील, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ कांचनमालादेवी मोहिते पाटील या बंधूंच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.त्यांना चांदीची तलवार व संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या वतीने चांदीचा लेझीम भेट देण्यात आला.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,सौ. नंदिनीदेवी मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते.
शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,सौ ऋतुजादेवी मोहिते पाटील,सौ सुमित्रादेवी खानविलकर,कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील,चि. सयाजीराजे मोहिते पाटील,व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख,सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते.

या सत्काराला उत्तर देताना जयसिंह मोहिते पाटील म्हणाले की,मागील पन्नास वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.त्यापैकी बरेच जण आज अस्तित्वात नाहीत.त्यांच्यामुळेच मी माझ्या आयुष्यातील काही चांगल्या गोष्टी करू शकलो. रयतेचा राजा शिवछत्रपती हे केवळ करमणुकीसाठी नाट्य नाही,तर यातून आपण चांगल्या गोष्टी अंगीकारल्या पाहिजेत. शिवाजी महाराजांनी लाखमोलाचे सहकारी निर्माण केले.छत्रपती शिवाजींनी रयतेच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली व त्यांच्या पश्चात ती २७ वर्ष धगधगत राहिली. शिस्त,कष्ट,जिद्द व स्वाभिमान हे या नाटकातून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या मनात ज्वलंत देशभक्ती निर्माण व्हावी यासाठीच या महानाट्याचे आयोजन केले.सर्वांनी स्वाभिमान टिकवण्यासाठी शिवाजी महाराजांचे गुण अंगीकारले पाहिजेत.

या महानाट्यासाठी क्रीडा संकुलवर उभारलेल्या १२५ फुट लांब व ७० फुट रुंद अशा भव्य रंगमंचावर शिवाजी महाराजांच्या भूमिकेत चित्रपट कलावंत शंतनू मोघे, जिजाऊंच्या भुमिकेत अभिनेत्री पल्लवी वैद्य, बाजी प्रभूंच्या भुमिकेत अभिनेते रवींद्र कुलकर्णी आणि अफजल खानाच्या भूमिकेत अभिनेते विश्वजीत फडते यांच्यासह स्थानिक ९०० हून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अभिनेते अजय तपकिरे,सुत्रधार डॉ.विश्वनाथ आवड होते.

शिवजन्मपूर्व कालापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतचे महत्वाचे प्रसंग या महानाट्यातून साकारले.यात अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी,स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व जिजाऊ मॉंसाहेब यांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न, शिवजन्म-बारसे,बालशिवाजीचे शिक्षण, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, रांजाच्या पाटलाला सुनावलेली शिक्षा,प्रतापगडावरील पराक्रम, पन्हाळ्याहून सुटका, शिवा काशिदचे व बाजीप्रभूचे आत्मबलीदान,बहलोल खानाचा प्रसंग व सेनापती प्रतापराव गुजर यांची आत्माहुती,गड आला पण सिंह गेला व शेवटी शिवराज्याभिषेक इत्यादी प्रसंग हुबेहूब साकारले.यामधील पायदळ व घोडदळाचा प्रत्यक्ष सहभाग यामुळे या महानाट्याने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला.

## महिलेस शिवीगाळ; मुलाला गायब करण्याची धमकी




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** कामाला जाणाऱ्या बायांसाठी माझे वाहन का लावत नाही म्हणून महिलेस शिवीगाळ करून मुलास गायब करण्याची धमकी दिल्याप्रकरणी बबलू यशवंत यमगर (रा. वैराग) याच्याविरुद्ध वैराग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी व त्यांची आई दोघी घराब पाणी भरीत असताना आरोपी फिर्यादीचे घरात आला व फिर्यादील म्हणाला की, तु शेतात कामाल जाणाऱ्या बायांसाठी माझे वाहन का लावत नाही. तेव्हा आरोप याने तु मुकादम आहे, तुझ्या मुलाल गायब करतो अशी दमदाटी करुन फिर्यादीला शिवीगाळ केली फिर्याद महिलेने दिली आहे.

» पान १ वरुन

## मी पुन्हा आलो!

तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. यावेळी भाजप ज्यासाठी ओळखले जाते त्या धक्कातंत्राचा वापर करत महाराष्ट्रात यंदा मराठा किंवा ओबीसी चेहऱ्याला संधी देऊ शकते असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र या सगळ्यांमध्ये देवेंद्र फडणवीसांनी बाजी मारली. फडणवीस सहा वेळा आमदार राहीलेले आहेत. त्यांना संघटनापासून ते सरकारपर्यंत सर्व कामांचा अनुभव आहे. २०१९ मध्ये भाजपला मोठा विजय मिळूनदेखील त्यांना विरोधी पक्षात बसावे लागले होते. त्यावेळी फडणवीसांनी विरोधी पक्षनेतेपद आक्रमकपणे सांभाळत मविआ सरकारवर जोरदार हल्लाबोल केला होता.,कोरोना काळातील उद्धव ठाकरे यांच्या सरकारला कोंडीत पकडण्यात तसेच कोविड साहित्य खरेदी घोटाळा उघड करण्यात देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेत्यांची महत्वाची भूमिका होती.२०२२ मध्ये शिवसेनेत फूट पाडून एकनाथ शिंदे एनडीएत आले तेव्हा फडणवीस यांची भूमिका महत्वाची राहीली. त्यांनी मुख्यमंत्री न रहाता एकनाथ शिंदे यांना पाठींबा देत नमती भूमिका घेतली. राज्यातील सरकार अडीच वर्षे सुरळीत चालवून एका आमदाराला फूटू दिले नाही.भाजपाच्या पक्षश्रेष्टींनी फडणवीस यांना उपमुख्यमंत्री पद बनवले तेव्हा त्यांनी तो निर्णय स्वीकारण्यास जराही संकोच बाळगला नाही. आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मागची अडीच वर्षे उत्तम सरकार चालवले. महाराष्ट्र भाजपाने साल २०१९ मध्ये १०५ जागा जिंकल्या होत्या. परंतू २०२२ मध्ये झालेल्या सत्तापालटाने एनडीए सरकार स्थापन झाली तेव्हा भाजपाचे केवल दहा मंत्री बनले तर ४० आमदार असलेल्या शिवसेनेला दहा मंत्री पदे मिळाली. फडणवीस सरकारमध्ये फडणवीस यांनी दुय्यम भूमिका घेत भाजपाच्या आमदारांना एक ठेवत एकनाथ शिंदे यांचे सरकार व्यवस्थित चालवले.साल २०२३ फडणवीस यांनी अजितदादा गट फोडण्यात महत्वाची भूमिका बजावली आणि अजित गटाच्या ४२ आमदारांना महायुतीत सामील केले. फडणवीस यांनी पॉवर शेअरिंगचा फॉर्म्युला काढत अजितदादांच्या नऊ आमदारांना कॅबिनेटमध्ये स्थान दिले. भाजपा-शिवसेनेच्या कोणाही मंत्र्यावर अन्याय होऊ दिला नाही.भाजपाने अजितदादांसाठी आपले सहा खाती सोडली.तर शिंदे गटानेही देखील पाच खाती सोडली. लोकसभा २०२४ निवडणूकांचा भाजपाला महाराष्ट्रात मोठा फटका बसला. या निवडणुकीतून त्यांनी जनतेचा मूड ओळखला आणि रणनीती बदलली. राज्य सरकारने लाडकी बहिण अशी मध्य प्रदेशातील गेमचेंजर योजना आणली. याचा फायदा निवडणुकीत झाला आणि भाजपचे विक्रमी १३२ आमदार निवडून आले.

## पाच वर्षांपासून मंदिर समितीचा .....

पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्न करत आहे. मात्र शासनाकडून नवीन मंदिर समिती जाहीर होत नसल्यामुळे ती केव्हा होणार याकडे लक्ष लागले आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर पुरातन असल्यामुळे याचे संवर्धन व जपवणूक करण्यासाठी शासनाने कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. यातून कामे सुरू आहेत. पंढरीत येणाऱ्या भाविकांना विठ्ठल दर्शन रांगेत ऊन, वारा, पाऊस याचा त्रास होऊ नये म्हणून मंदिर समितीने रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ नवीन दर्शन मंडप उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. या शासनाने मंजुरी दिली असून कामास लवकरच आषाढी यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच सरडा भवन ते दर्शन मंडप पर्यंत बांधण्यात येणार आहे.

## लोकसभेनंतर विधानसभेत...

सरकार आहे. देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: सलग तीन वेळा येथील मुख्यमंत्री राहिले आहेत. महाराष्ट्राच्या शेजारील राज्य असलेल्या गोवा राज्यात एनडीएची सत्ता आहे. तिथे भाजपचे प्रमोद सावंत मुख्यमंत्री आहेत. प्रमोद सावंत हे सलग दुसऱ्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री आहेत. १४७ विधानसभा जागा असलेले ओडिशाचे विद्यमान मुख्यमंत्री भाजपचे मोहन चरण माझी आहेत. त्यांनी १२ जून २०२४ रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आसाममध्ये भाजपची सत्ता असून तिथे हेमंता बिस्व शर्मा मुख्यमंत्री आहेत. तर उत्तराखंडमध्ये भाजपचे पुष्कर सिंह धामी मुख्यमंत्रीपदावर विराजमान आहेत. मणिपूरमध्येही भाजपची सत्ता असून बिरेन सिंह मुख्यमंत्री आहेत. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री भाजपचे पेमा खांडू आहेत. मेघालय, नागालँड आणि त्रिपुरामध्ये एनडीए आघाडीची सरकारे आहेत. तर बिहार आणि आंध्र प्रदेशमध्ये भाजप-एनडीएची सत्ता आहे. मात्र, मुख्यमंत्रीपद भाजपकडे नाही. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू हे आंध्र प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री आहेत.

## प्रणिती शिंदे यांनी लोकसभेत केली'ही'मागणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** रेल्वे प्रवासात खेळाडूंना सवलत देण्याची मागणी सोलापूर लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज संसदेच्या अधिवेशनात लोकसभेत केली आहे. प्रणिती शिंदे म्हणाल्या की खेळाडूंना स्पर्धेनिमित्त रेल्वे विविध राज्यांमध्ये प्रवास करावा लागतो. खेळाडू हे स्पर्धेत यश मिळवून आपल्या देशाचे व राज्याचे नावलौकिक करीत असतात त्यामुळे तिकिटांमध्ये त्यांना विशेष सवलत दिली तर खेळाडूंसाठी आणखी सोयीचे होईल. त्यावर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

## शिवछत्रपती महानाट्य

पंढरी संचार छायाचित्र सेवा



माळशिरस : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक ०२ व ०३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा- राजा शिवछत्रपती या महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकार्यांच्या पराक्रमांचा ज्वलंत इतिहास उलगडला.हजारों रसिकांनी याला भरभरुन दाद दिली.

## एनआयटी कॉम्प्युटरच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** महाराष्ट्र ज्ञान महामंडळ म्हणजे एमकेसीएलच्या वतीने केला जाणारा उत्कृष्ट व्यावसायिकता व प्रवेशाचा अवार्ड यंदा सलग 17 व्या वर्षी एनआयटी कॉम्प्युटरला मिळाला.
आज डॉ निर्मलकुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ अर्थात MKCL ची वार्षिक सभा संपन्न झाली. यावेळेस एनआयटी कंप्यूटर च्या वतीने सेंटर हेड श्री गणेश जाधव व मी हा पुरस्कार MKCL च्या व्यवस्थापकीय संचालिका मा.वीणा कामत मॅडम यांचे हस्ते हा पुरस्कार स्वीकारला MS-CIT या वर्षी रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत रौप्य



महोत्सवी वर्षात पुन्हा एकदा एन आय टी कॉम्प्युटर्सला पुरस्कृत करण्यात आल्यानं एन आय टी कॉम्प्युटर मागील 23 वर्षा पासून राबवित असलेल्या विविध उपक्रम व विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रशिक्षण शासनाकडून आलेले वेगवेगळे प्रशिक्षण सर्वसामान्य विद्यार्थी व गरीब होतकरू विद्यार्थी व विद्यार्थिनींना केलेले सहकार्य व आजपर्यंत विद्यार्थ्यांनी दिलेल्या विश्वास याबद्दल पुन्हा एकदा एमकेसीएल कडून शिक्कामोर्तब करण्यात आले यावेळी लोकल लीड सेंटर चे श्री रोहित जेऊरकर, श्री हारून शेख, विभागीय समन्वयक श्री महेश पत्रीके, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे श्री अमित रानडे, श्री अतुल पतौडी, श्री कुंभार, श्री कौशल, डॉ दीपक पाटील, श्री कटकधोंड, आदी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

अ‍ॅड. अनिल बबन भोसले, मु.पो.दिघंची
ता.आटपाडी, जि.सांगली
दिवाणी किरकोळ अर्ज नं.९२/२०२४
निशाणी नं.९

पंढरपूर येथील मे. सि. ज. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात...
श्रीमती शोभा भिमराव कोरे - अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही - जाबदार

ज्याअर्थी मयत तानाजी भिमराव कोरे रा.पंढरपूर, ता.पंढरपूर जि. सोलापूर यांचा मृत्यु दि. २८/११/२०१६ उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे मयत झाले असून अर्जदार यांचे पती भिमराव बाबुराव कोरे यांचा मृत्यु दि. १९/०१/२००३ काडादी रुग्णालय सोलापूर येथे मयत झाले आहेत. त्यांचे वारस खालीलप्रमाणे श्रीमती शोभा भिमराव कोरे वय ६३ धंदा घरकाम, रा.पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर हे वारस आहेत. मयत तानाजी भिमराव कोरे मौजे देगांव ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील जमीन गट नं. 136/4/ब प्लॉट नं. 37 क्षेत्र चौ.मी.असल्यामुळे बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी असा अर्जकरीत आहे. ज्याअर्थीसदरहून मयत तानाजी भिमराव कोरे रा.पंढरपूर, जि.सोलापूर यांना अर्जदार श्रीमती शोभा भिमराव कोरे हे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्यास असेल तर त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवण्यात यावी आणि जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास तर सदरहून शाबित दिसल्यास त्याला सदरहून मयत तानाजी भिमराव कोरे रा.पंढरपूर, ता.पंढरपूर जि.सोलापूर यांना अर्जदार श्रीमती शोभा भिमराव कोरे हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसाचे सर्टिफिकेट देईल. पुढील तारीख 10.01.2025 नेमलेले आहे.
म्हणून दिली जाहीर नोटीस

सही/- (शिक्का) सही/-
कनिष्ठ लिपिक — अधिक्षक
सिव्हील न्यायालय क.स्तर,पंढरपूर — सिव्हील न्यायालय क.स्तर,पंढरपूर


नियमित वाचा
'दै.पंढरी संचार'


### सांगोले नगरपरिषद, सांगोले
### जाहीर टेंडर नोटीस

सांगोले नगरपरिषद सांगोले ही अनुभवी नोंदणीकृत संस्था व ठेकेदार यांचेकडून खाली नमुद केलेल्या कामाच्या मोहोरबंद निविदा व्दिलिफाफामध्ये पद्धतीने मागवित आहे.

| अ. नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षित रक्कम रुपये | ठेकेदाराचा वर्ग | कामाची मुदत | निविदा फॉर्म किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नगरपरिषद निधीतील कामे | | | | | | |
| १. | नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारतीस रंगकाम करणे व लोखंडी जाळी बसविणे | 111422 | 1114 | 2228 | वर्ग 8 व त्यावरील | 60 दिवस | 500 |
| | फेर निविदा प्रसिद्धीकरण २ री वेळ | | | | | | |
| १. | नगरपरिषदेकडील अग्निशमन अधिकारी निवास क्रं.२ येथे रंगकाम, फरशी व इतर दुरुस्ती करणे. | 494431 | 4944 | 9889 | वर्ग 8 व त्यावरील | 60 दिवस | 500 |
| २. | नगरपरिषदेकडील अग्निशमन अधिकारी निवास क्रं.३ येथे रंगकाम फरशी व इतर दुरुस्ती करणे. | 494431 | 4944 | 9889 | वर्ग 8 व त्यावरील | 60 दिवस | 500 |
| ३. | महात्मा फुले चौक येथे आहेरकर कॉम्प्लेक्स ते डॉ.माळी कॉम्प्लेक्स पर्यंत आरसीसी पाईप गटार बांधणे. | 199745 | 1997 | 3995 | वर्ग 8 व त्यावरील | 60 दिवस | 500 |
| ४ | महात्मा फुले चौक येथे डॉ. माळी कॉम्प्लेक्स ते मायाक्का मंदिरपर्यंत आरसीसी पाईप गटार बांधणे. | 136113 | 1361 | 2722 | वर्ग 8 व त्यावरील | 60 दिवस | 500 |

निविदा मागणी अर्जामध्ये कामाचा अ.नं. व कामाचे नाव लिहावे. दिनांक ५/१२/२०२४ पासून दि. १६/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयात कोऱ्या निविदा मिळतील. निविदा पत्रकासोबत नोंदणीपत्र व अनुभवाचे दाखले जोडणे आवश्यक आहे. बयाणा रक्कमेची पावती लिफाफा जोडून दि. १७/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये नगरपरिषद कार्यालयात निविदा दाखल कराव्यात. निविदा शक्यतो त्याच दिवशी दु. ४.३० वा. उपस्थित ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर उघडल्या जातील. मुदतीनंतर आलेल्या निविदा पत्रकांचा विचार केला जाणार नाही. कमी अगर जादा दराची निविदापत्रके कोणतेही कारण न दर्शविता मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
टिप - १. मंजूर संस्थांना बयाणा रक्कम भरणे आवश्यक आहे. अन्यथा निविदांचा विचार केला जाणार नाही. बयाणा रक्कमेची पावती न.प. कार्यालयात करावी. २. मजूर संस्था/ ठेकेदारांनी बयाणा रक्कमेची पावती व निविदापत्रके २ स्वतंत्र लखोट्यात बंद करुन द्यावेत. ३. तसेच बी १ फॉर्म मधील सर्व अटी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील व तो करारपत्राचा एक भाग असेल. ४ निविदा भरणारे ठेकेदारांनी सादर केलेली सर्व प्रकारची कागदपत्रे सत्य असलेबद्दलचे रु. ५००/- चे स्टॅंप पेपरवर अफेडिव्हीएट जोडावे. खोटी कागदपत्रे आढळल्यास कायदेशीर कारवाई होईल. ५. पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे. ६. ठेकेदाराकडे जी.एस.टी.नंबर असणे आवश्यक आहे. ७. परिशिष्ट अ जोडावे. ८. शासनाच्या वेळोवेळी असणाऱ्या दराप्रमाणे सर्व कर कपातीच्या सुचना व अटी निविदाधारकांना बंधनकारक राहतील. ठेकेदाराकडे पी.एफ. रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. ९. ठेकेदाराने नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. १०. ठेकेदाराने तत्सम कामे केलेबाबतचे प्रमाणपत्र जोडावे. ११. आर्थिक क्षमता समर्थनार्थ कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. १२. भविष्यात लेखापरिक्षणात आपेक्ष/वसूली निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. १३. ठेकेदार काळ्या यादीत नसलेचे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रमाणपत्र जोडावे.

(शिक्का)

सही/-
(डॉ. सुधीर गवळी)
मुख्याधिकारी,नगरपरिषद सांगोले


## सहकार महर्षि कारखान्याचे सहवीज प्रकल्पास

# 'उत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प' पुरस्कार जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडीया यांचे वतीने सन २०२४ चा "उत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प" पुरस्कार जाहीर झाला आहे.
कारखान्याचे मार्गदर्शक संचालक,महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर चालू आहे.यापूर्वीही सहकार महर्षि कारखान्यास राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सहकार महर्षि कारखान्यावर ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद यांचा मोठा विश्वास असून चालू गळीत हंगामात १० लाख मे.टन गाळप करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे.ऊस गाळपा बरोबर कारखान्याने वीज निर्मितीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या कामगिरीची दखल घेऊन को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया यांनी "उत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प" पुरस्कार जाहीर केला असल्याची माहिती कारखान्याचे



कार्यकारी संचालक श्री.राजेंद्र चौगुले यांनी दिली.को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडीया यांचे वतीने सन २०२४ चा "उत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प" पुरस्कार जाहीर झाल्याने कारखान्याचे संचालक,कार्यक्षेत्रातील सभासद,ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे अधिकारी व कामगार तसेच हितचिंतक यांचेमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# संभ्रम मिटावा!

'ल'हाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर विरोधी पक्षांनी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनचा मुद्दा लावून धरला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ईव्हीएमबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पुन्हा एकदा मतपत्रिकांद्वारे मतदान घेतले जावे, या मागणीसाठी देशव्यापी मोहीम सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. खर्गे यांच्या घोषणेच्या एक दिवस अगोदरच सर्वोच्च न्यायालयाने मतपत्रिकांद्वारे पुन्हा मतदान घेतले जाण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली होती. केवळ एवढ्यावरच न्यायालय थांबले नाही, तर त्यांनी याचिकाकर्त्याला चांगलेच फटकारले होते. त्यातून सर्वच राजकीय पक्षांना न्यायालयाने संदेश दिला. आता प्रश्न असा आहे की पक्ष हा संदेश स्वीकारणार का आणि दुसरी बाब म्हणजे राजकीय पक्षांकडून ईव्हीएमच्या संदर्भात ज्या उणिवांकडे बोट दाखवले जाते आहे त्यावर निवडणूक आयोगाची काय प्रतिक्रिया आहे? जेव्हा कोणी निवडणुकीत पराभूत होतो तेव्हाच ईव्हीएम खराब आहे, त्यात छेडछाड केली गेली असे आरोप होतात. जर तीच व्यक्ती किंवा पक्ष विजयी झाला तर मात्र ईव्हीएमच्या विरोधात कोणी काही बोलत नाही. याकडे आम्ही कसे पाहायचे, असा सवाल सुप्रीम कोर्टानेही केला आहे. त्यांचा प्रश्न वस्तुस्थितीला धरून आहे. कारण, सत्ता येण्याची अपेक्षा असतानाच तिने हुलकावणी दिली किंवा अपेक्षेनुरूप निकाल आले नाहीत की ओरड सुरू होते. न्यायालयातील सुनावणीच्या वेळी आंध्र प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी या दोघांचे उदाहरण समोर ठेवले गेले. नायडू जेव्हा पराभूत झाले होते तेव्हा त्यांनीही ईव्हीएमला आक्षेप घेतला. आता विजयी झाल्यावर ते काहीच बोलले नाहीत. याउलट आता पराभूत झालेले जगनमोहन रेड्डी यांनी ईव्हीएमबद्दल शंका व्यक्त केली. हा पायंडाच पडला असल्याचेच न्यायालयाला सूचित करायचे होते आणि या विषयावर युक्तिवाद किंवा वादविवाद करायचे हे स्थान नाही, असेही न्यायालयाने सुनावले. मतपत्रिकांद्वारेच पुन्हा मतदान घेण्याची मागणी न्यायालयाने ज्या आधारावर फेटाळली आहे त्यावरही विचार होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात निकाल विरोधी पक्षांच्या अपेक्षेच्या विपरीत आल्यामुळे गदारोळ आहे. तेच झारखंडमध्ये निकाल त्यांना अनुकूल आल्याबद्दल सगळे गप्प आहेत. गमतीने असाही युक्तिवाद केला जातोय की जाणूनबुजून लहान राज्य सोडून मोठे राज्य मिळवण्यासाठीच ही सेटींग केली गेली असावी. अशी विधाने येण्याची कारणे म्हणजे मनात घुसलेले संशयाचे भूत. एकदा तुमच्या मनात संशय निर्माण झाला की तुम्हाला त्रैलोक्यातही संचार केला तरी मन:शांती लाभत नाही. दावे अनेक झाले आहेत. तरीही वास्तव हेच आहे की ईव्हीएमच्या विरोधात म्हणजे त्यात त्रुटी आहे किंवा गोलमाल आहे असे सिद्ध करणारा एकही पुरावा अद्याप कोणीही सादर करू शकले नाही. परवा न्यायालयातही अमेरिकेचे इलॉन मस्क यांच्या टिप्पणीचा आधार घेतला गेला. ईव्हीएममध्ये छेडछाड करता येऊ शकते असे मस्क अलीकडे म्हणाले होते. मस्क आणि त्यांच्या कंपन्या कितीही तंत्रकुशल असल्यातरी त्यांच्या या एका विधानाच्या आधारे आपण सगळे शंकास्पद मानायचे का? बरे मस्क यांनी काही सिद्ध केले नसतानाही मस्क असे म्हणतात म्हणजे ते बरोबरच असेल असे गृहीत धरायचे का? ईव्हीएम सोडून पुन्हा एकदा मतपत्रिकांच्या काळाकडे परतणे म्हणजे प्रतिगामी पाऊल ठरेल असे मागेच न्यायालयाने म्हटले होते. ईव्हीएमपूर्वीची निवडणूक प्रक्रियाही प्रचंड गैरप्रकारांनी बोकाळली होती. आता पुन्हा त्या सर्व बाबी म्हणजे मतदान केंद्र ताब्यात घेणे, एकाच गुंडाने केंद्रात घुसून सगळ्यांचे शिक्के मारणे किंवा मतपेट्या पळवणे हे सगळे स्वीकारण्याची तयारी करायची आहे का? आरोप करताना राजकीय पक्षांचे एका गोष्टीकडे सर्रास दुर्लक्ष होते व ती गोष्ट आहे मतदारांची राजकीय सूज्ञता. मतदार प्रगल्भ आहेत व त्यांनी वेळोवेळी ते सिद्ध केले आहे. काही राज्यांची प्रथा अशी आहे की ते केंद्रात एका पक्षाला आणि राज्यात दुसर्या पक्षाला सत्तेवर आणतात. काही राज्ये दर पाच वर्षांनी सरकार बदलतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुका एकत्र होत असतील तरी त्यांचा कौल बदलत नाही. त्यांना राज्यात जो हवा आहे त्यालाच आणि केंद्रात जो हवा आहे त्यालाच ते मते देतात. मतदार एवढे सूज्ञ असताना आपल्या पराभवाच्या अन्य कारणांची मीमांसा करणे हे राजकीय पक्षांचे काम आहे. केवळ ईव्हीएमकडे बोट दाखवायला नको. निवडणूक आयोगाचेही कर्तव्य आहे की ईव्हीएमच्या बाबतीत केवळ ते तांत्रिकदृष्ट्या किती सुरक्षित आहे याचा युक्तिवाद करत बसण्यापेक्षा जे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत, उदाहरणार्थ, उमेदवारांना त्यांच्या घरातलीच मतेही न मिळणे, प्रत्यक्ष मतदानापेक्षा निकालात मिळालेली मतांची आकडेवारी याकडे त्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. विरोधी पक्षांना संधी मिळाली तर ते शंका घेणारच आणि शंका उपस्थित केली गेली की संशय कल्लोळ होणारच. जगातील अनेक देशांनी ईव्हीएम नाकारले आहे ही बाब सत्य आहे. तथापि, भारताने तो मार्ग पत्करलेला नाही. मतमोजणीसाठी लागणारा वेळ आणि प्रचंड लोकसंख्या ही मतपत्रिकेला विरोध करण्यामागची कारणे सांगण्यात आली आहेत. तर्क किंवा वास्तव म्हणून आयोगाचे हे म्हणणे मान्य केले, तरी लोकशाही प्रक्रियेबाबत जे गंभीर प्रश्न सातत्याने उभे राहत आहेत त्याकडे दुर्लक्ष कसे करता येईल.

**दहा वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकांमध्ये सबंध देशभरामध्ये आलेल्या मोदी लाटेत अनेक प्रस्थापित पक्षांचा सुपडासाफ झालेला पहायला मिळाला. यामध्ये राष्ट्रीय पक्षांबरोबरच प्रादेशिक पक्षांचीही वाताहात झाली. २०१९ मध्येही याचीच पुनरावृत्ती झाली. दक्षिणेकडील द्रमुक, पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस असे अपवाद वगळता अन्य पक्षांची अक्षरशः हाराकिरी झाली. २०१९ ते २०२४ या काळात या बुडत्या पक्षांना इंडिया आघाडीमुळे काठीचा आधार मिळाला. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसह अन्य ठिकाणी झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांनी पुन्हा एकदा या पक्षांपुढे अस्तित्वाचे संकट उभे केले आहे. महायुतीच्या महापुरात छोटे पक्ष अक्षरशः वाहून गेले आहेत. सतत भूमिका बदलणाऱ्या छोट्या पक्षाच्या नेत्यांना मतदारांनी चपखल संदेश दिला आहे. या संदेशातून योग्य तो धडा ते घेतात का यावरच त्यांचे भवितव्य अवलंबून असणार आहे.**

# छोट्या पक्षांचे काय होणार?

**विश्वास सरदेशमुख,**
**ज्येष्ठ पत्रकार**

'द'हा वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकांमध्ये सबंध देशभरामध्ये आलेल्या मोदी लाटेत अनेक प्रस्थापित पक्षांचा सुपडासाफ झालेला पहायला मिळाला. यामध्ये राष्ट्रीय पक्षांबरोबरच प्रादेशिक पक्षांचीही वाताहात झाली. २०१९ मध्येही याचीच पुनरावृत्ती झाली. १९८०नंतर देशात प्रादेशिक पक्ष स्थापण्याची प्रक्रिया वेगाने चालू झाली होती. याला जनता पक्ष, जनता दल या समाजवादी आणि मध्यममार्गी पक्षाची झालेली शकले कारणीभूत होती. जनता पक्षाचे १९८०नंतर असंख्य तुकडे झाले. या तुकड्यांचे अगणित उपतुकडे झाले. चरणसिंह यांचे चेले देविलाल यांनी लोकदलातून बाहेर पडून स्वतंत्र लोकदल स्थापन केला. १९९०नंतर जनता दलाच्या विभाजनानंतर या पक्षातील प्रादेशिक सुभेदारांनी आपापल्या राज्यात आपापले पक्ष काढले. मुलायमसिंह यादव, लालू प्रसाद यादव, नितीशकुमार, रामविलास पासवान, देवेगौडा या मंडळींनी आपापल्या पक्षाच्या सुभेदाऱ्या निर्माण केल्यामुळे देशातील प्रादेशिक पक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. ओडिशातील जनता दलाचे नेते बिजू पटनाईक यांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनी जनता दलापासून विभक्त होत बिजू जनता दलाची स्थापना केली. या पक्षाचे नेतृत्व बिजू पटनाईक यांचे चिरंजीव नवीन यांच्याकडे देण्यात आले.१९८०च्या दशकात सुप्रसिद्ध तेलगू अभिनेते एन. टी. रामाराव यांनी आंध्र प्रदेशात तेलगू देसमची स्थापना करत काँग्रेसला आव्हान दिले. प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे देशात एक पक्षीय राजवट येण्याचे दिवस संपले हे १९९१ ते ९९ या आठ वर्षात स्पष्टपणे दिसून आले. २००४ मध्येही काँग्रेसला वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष समझोता, आघाडी करत सरकार स्थापन करावे लागले आणि ते टिकवावे लागले. २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसला २०६ जागा मिळाल्या मात्र केंद्रातील सत्ता मिळवण्यासाठी या पक्षाला तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल यासारख्या प्रादेशिक पक्षांची मदत घ्यावीच लागली होती. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व याही निवडणुकीत अबाधित राहिले. पण २०१४ नंतर प्रादेशिक पक्षांचे महत्त्वच कमी-कमी होत गेले. दक्षिणेकडील द्रमुक, पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस असे अपवाद वगळता अन्य पक्षांची अक्षरशः हाराकिरी झाली. २०१९ ते २०२४ या काळात या बुडत्या पक्षांना इंडिया आघाडीमुळे काठीचा आधार मिळाला. लोकसभा निवडणुकांमध्ये यातील अखिलेश यांचा समाजवादी पक्ष, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस यांसारख्या पक्षांची कामगिरीही चांगली राहिली. '४०० पार'चा नारा देत निघालेला भाजपचा रथ उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात रोखण्यात या दोन्ही पक्षांना चांगले यश आले. मायावतींच्या बसपाला २०१४ पासून लागलेली ओहोटी २०२४ मध्येही कायम राहिली. मायावती यांच्या बहुजन समाज पक्षाने २००४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात सर्वच मतदारसंघांत उमेदवार दिले होते. या सर्व उमेदवारांनी लाखावर मते घेऊन काँग्रेसचे उमेदवार पाडण्यात त्यावेळी मोठी भूमिका बजावली होती. मात्र, त्यानंतर झालेल्या प्रत्येक लोकसभा व विधानसभा निवडणुकीत बसपच्या 'हत्ती'ची चाल मंदावली. या विधानसभा निवडणुकीत तर बसपच्या जिल्ह्यातील एकाही उमेदवाराला पाच हजार मतांचा पल्ला गाठता आला नाही. वास्तविक, लोकसभेच्या निकालामुळे काँग्रेसपासून फारकत घेऊन सवतासुभा निर्माण करणाऱ्या या छोट्या पक्षांना पुन्हा काँग्रेसचे बोट धरून आपली राजकीय वाटचाल सुरळित झाल्याचे वाटू लागले होते. परंतु महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसह अन्य ठिकाणी झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांनी पुन्हा एकदा या पक्षांपुढे अस्तित्वाचे संकट उभे केले आहे.

विशेषतः महाराष्ट्रामध्ये महायुतीला मिळालेल्या 'लँडस्लाईड व्हिक्ट्री'मुळे शरद पवारांचा राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना, मनसे आणि अपक्षांसह बहुतांश छोट्या पक्षांचा डब्बा गूल केला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अनेक छोटे पक्ष स्वतंत्रपणे या निवडणुकीला सामोरे गेले होते. यातील कित्येक पक्षांनी निवडणूक निकालांपूर्वी 'आमच्याशिवाय मुख्यमंत्री होणार नाही,' असा दावा करण्यास सुरुवात केली होती. विदर्भातील 'प्रहार' संघटनेचे नेते आणि आक्रमक आमदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बच्चू कडू यांनी तर आम्हीच लहान पक्ष आणि अपक्षांसोबत संपर्क करत आहोत. आमचीच सत्ता येणार आहे आणि आम्ही सरकार स्थापन करणार आहोत. प्रस्थापितांनी थांबावं आणि लहान पक्षाचं सरकार यावं, अशा प्रकारचं गणित आम्ही मांडत आहोत. १०-१५ जागा दुसऱ्या आघाडीच्या येतील. अपक्ष आणि लहान पक्षांचं सरकार आम्ही स्थापन करू', असे म्हटले होते. पण बच्चू कडू स्वतः अचलपूर मतदारसंघातून पराभूत झाले आहेत. बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष होता परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीत सहभागी होता. या दरम्यानच्या काळात तिसऱ्या आघाडीच्या प्रचारासाठी बच्चू कडू यांनी राज्यभरात विक्रमी सभा घेतल्या होत्या. तरीही त्यांना मोठ्या पराभवाला समोर जावे लागले आहे. शिवसेनेपासून वेगळे झाल्यानंतर राज ठाकरे यांनी मनसेची स्थापना केली आणि २००९ च्या विधानसभा निवडणुकीत आपले १३ आमदार निवडून आणले होते. नाशिकमधून मनसेचे तीन आमदार निवडून आल्याने तो पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला. परंतु मनसेला त्या निवडणुकीतील यशाची पुनरावृत्ती करता आली नाही. २०१४ च्या विधानसभेला मनसेचा एकच आमदार निवडून आला. जुन्नरमधून शरद सोनवणे आमदार झाले. तर २०१९ च्या निवडणुकीआधीच सोनवणेंनी पक्ष सोडला. २०१९ मध्ये राजू पाटील हे एकमेव मनसे आमदार निवडून आले. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मनसेने १३६ हून अधिक जागा लढवल्या होत्या. त्यासोबतच त्यांनी १२ जागांवर महायुतीला पाठिंबा दिला होता. निकालानंतर महायुती विजयी होणार आणि मनसे सत्तेत सहभागी होणार असा दावा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला होता. मात्र राज ठाकरे आपले पुत्र अमित ठाकरेंनाही ते विजयी करु शकले नाहीत. दुसरीकडे त्यांचे एकमेव आमदार राजू पाटील यांचाही या निवडणुकीत पराभव झाला. या पराभवामुळे मनसे पक्षाची मान्यताच रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

१९९० पासून वसई विरारच्या राजकारणावर आपले वर्चस्व असलेल्या बहुजन विकास आघाडीलाही या निवडणुकीत प्रथमच मोठा धक्का बसलो. हितेंद्र ठाकुरांच्या बहुजन विकास आघाडीचावसई विरारच्या राजकारणात मागील ३५ वर्षांपासून दबदबा होता. पण एकहाती सत्ता असणाऱ्या या पक्षाच्या तिन्ही उमेदवारांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आहे. नालासोपारा मतदारसंघातून ३ वेळा आमदार असलेले क्षितिज ठाकूर यांचा भाजपच्या राजन नाईक यांनी पराभव केला. तर आयुष्यात एकही निवडणूक न लढवलेल्या भाजपाच्या स्नेहा दुबे पंडित यांनी हितेंद्र ठाकूर यांचा वसईमध्ये पराभव केला.

राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी वंचित बहुजन आघाडी या पक्षाची स्थापना केली होती. २०१९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये या आघाडीने अनुक्रमे ७.६४ टक्के आणि ४.६ टक्के मते मिळवली होती. परंतु नंतरच्या काळात या पक्षाचा प्रभाव कमी होत गेला. यंदा राज्यात सर्वाधिक जागा लढवणारा पक्ष म्हणून वंचितकडे पाहिले जात होते. या आघाडीने २०० लढवल्या खऱ्या; पण एकाही जागेवर त्यांना यश मिळाले नाही. छत्रपती संभाजी राजे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र स्वराज्य पक्षालाही मतदारांनी साफ नाकारल्याचे दिसले.

असदुद्दीन ओवेसी यांच्या 'एमआयएम' या पक्षाने मागील काळात मराठवाडा आणि मुंबई पट्ट्यासह महाराष्ट्रात जोरदार वारे निर्माण केले होते. छत्रपती संभाजीनगरसारख्या मराठवाड्यातील शिवसेनेचा बालेकिल्ला असणाऱ्या मतदारसंघात एमआयएमच्या इम्तियाज जलील यांनी २०१९ ची लोकसभेची निवडणूकही जिंकली. परंतु या निवडणुकीत या पक्षाचा केवळ एकच आमदार विजयी झाला आहे. मालेगावमध्ये एमआयएमचे मुफ्ती मोहम्मद इस्माईल यांनी केवळ ७५ मतांनी विरोधी उमेदवाराचा पराभव केला आहे. एकंदरीत महायुतीच्या महापुरात छोटे पक्ष अक्षरशः वाहून गेले आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेबरोबरच देशातील १४ राज्यांमध्ये ४८ विधानसभेच्या जागांसाठी पोटनिवडणुका पार पडल्या. झालेल्या पोटनिवडणुकांमध्येही भाजपाने विजय मिळवल्याने अनेक पक्षांना फटका बसला आहे. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशमध्ये भाजपाने सातपैकी सहा जागा जिंकल्या आहेत. यामध्ये समाजवादी पक्षाच्या दोन जागादेखील खेचून आणण्यात पक्षाला यश आले आहे. या दोन जागा जवळपास तीन दशकांपासून भाजपाला जिंकता आल्या नव्हत्या. यामुळे लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करत सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या समाजवादी पक्षाला मोठा झटका बसला आहे. या पोटनिवडणुकांमध्ये पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालमध्ये भाजपला पराभूत केले आहे. निवडणुकांच्या राजकारणात प्रत्येक निकालाचे स्वतंत्र राजकीय समाजशास्त्र असते. परंतु सर्व निकालांमधून दिसून येणारा सरासरी सूर पाहिल्यास भारतीय मतदार आता स्थैर्याला प्राधान्य देताना दिसत आहे. तसेच निकालानंतरचा घोडेबाजार ज्या अपक्षांमुळे आणि छोट्या पक्षांमुळे रंगतो त्यांच्याबाबत मतदारांची नाराजी उघडपणाने स्पष्ट होऊ लागली आहे. लोकसभेच्या निकालात अपक्षांची घटत गेलेली संख्या हे ठळकपणाने दर्शवते. मतदारांच्या या बदललेल्या मानसिकतेचा आदर करत छोट्या पक्षांनी आपल्या राजकारणाची फेरमांडणी करण्याची गरज आहे. विशेषतः सतत भूमिका बदलणाऱ्या राज ठाकरे, प्रकाश आंबेडकर, बच्चू कडू यांच्यासारख्या नेत्यांना मतदारांनी चपखल संदेश दिला आहे. या संदेशातून योग्य तो धडा छोटे पक्ष घेतात का यावरच त्यांचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**
**गुरुवार, दिनांक ५ डिसेंबर २०२४,** मार्गशीर्ष शु. ४, उत्तराषाढा. श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. **नक्षत्र** : उत्तराषाढा, **योग** : वृद्धि, **करण** : बव. **सूर्योदय** : स.०६.२९ सूर्यास्त : सायं.०५.२९ वा.. **राहू काळ : दुपारी : १:३० ते ३:००**

**दिनविशेष**
▶१८९८ : प्रसिद्ध उर्दू कवी जोश मलिहाबादी यांचा जन्म. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांनी गझला लिहिण्यास सुरुवात केली. ▶१९०१ : जर्मन पदार्थवैज्ञानिक वार्नर हायसेनबर्ग यांचा जन्म. 'क्वॉटम मेकॅनिक्स' मधील मलूभूत संशोधनसाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला होता. ▶१९०१ : विख्यात व्यंगचित्रकार आणि दूरदर्शनवरील व्यंगचित्र मालिकेचे जनक वॉल्टर इलायन डिस्ने यांचा जन्म. 'मिकीमाऊस' चे ते जनक होत. ▶१९५० : पूर्वायुष्यात क्रांतिकारक आणि नंतर योगी म्हणून गाजलेले अरविंद घोष यांचे निधन. ▶१९५४ : 'भाऊबंदकी' या मराठी नाटकाला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. ▶१९९१ : ज्येष्ठ संस्कृततज्ञ आणि बौध धर्माचे अभ्यासक डॉ. वासुदेव विश्वनाथ गोखले यांचे निधन. ▶१९४५ : फ्लाईट १९, फोर्ट लॉडरडे, अमेरिकन नौदलाच्या ५ टी.बी.एम. व्हेनर जातीच्या विमानांची स्क्वॉड्रन बर्मयुडा त्रिकोणात गायब.

**राशीभविष्य**
▲ **मेष** : अपेक्षित कामात प्रगती. ▲ **वृषभ** : उलाढाला वाढेल. ▲ **मिथुन** : जबाबदाऱ्या वाढतील. ▲ **कर्क** : महत्वाची कामे होतील. ▲ **सिंह** : वसुलीस अनुकूल दिवस. ▲ **कन्या** : वादविवादात भाग घ्याल. ▲ **तुळ** : गृहसौख्य लाभेल. ▲ **वृश्चिक** : आनंददायक दिवस. ▲ **धनु** : उत्साह कमी होईल. ▲ **मकर** : अपेक्षित बातमी कळेल. ▲ **कुंभ** : नवीन अनुभव येतील. ▲ **मीन** : तणाव कमी होईल.

**चिंतन**
तुम्ही प्रामाणिकपणे भरपूर कष्ट करा. त्यापासून आत्मिक समाधान मिळेल, आणि सर्वांप्रति असलेली कर्तव्यपूर्तता सुरु केली की त्यापासून आनंदाची प्राप्ती होईल. सर्व आयुष्यच उजळून निघेल.



– स्वामी विवेकानंद

**व्यक्तीविशेष**
## राकेश मोहन
प्रख्यात आधुनिक हिंदी नाटककार, कथा, कादंबरीकार राकेश मोहन यांचा जन्म दि. ८ जानेवारी १९२५ रोजी अमृतसर येथे झाला. 'इन्सान के खंडहर', 'नये बादल', 'फौलादी की आकाश', हे त्यांचे कथासंग्रह तर 'अंधेरे बंदकमरे', 'अंतराल', 'न आनेवाला कल' या त्यांच्या कांदबऱ्या. राकेश मोहन यांनी केवळ तीनच नाटके लिहिली असील तरी हिंदी नाट्याक्षेत्रात गुणवत्तेने व प्रयोगक्षम लेखनामुळे ते महत्त्वाचे नाटककार मानले जातात. 'आषाढ का एक दिन', 'लहरों के राजहंस' आणि 'आधे अधुरे' ही त्यांची तीन नाटके. आधुनिक माणसाच्या एकटेपणाची, जीवनातल्या संवेदना बधिर होण्याची शोकांतकथा त्यांनी 'आषाढ का एत दिन'मध्ये चित्रित केली आहे. 'आधे अधुरे' या नाटकात सामाजिक वातावरणाचा उपयोग करून जीवनासंबंधीच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे. राकेश यांनी त्यांच्या अनेक एकांकिकातून वेगवेगळे प्रयोग केले आहेत. हिंदी कथेला नवकथेचे रुप देण्याच्या प्रयत्नात राकेश मोहन यांचा महत्त्वाचा सहभाग होता. निसर्ग आणि माणसे याबद्दल कुतूहल असणाऱ्या राकेश मोहन यांचे ५ डिसेंबर १९७३ रोजी निधन झाले.

**बोधकथा**
## काम करा आवडीनं
एकदा एका गावात एक मंदीर उभारण्याचं काम सुरू होतं. त्यासाठी दूरदेशातून दुर्मिळ असे दगड मागवण्यात आले होते. या दगडांवर कोरीव काम करण्यासाठी वेगवेगळ्या प्रांतातून तीन कुशल कारागीरांना बोलावण्यात आलं होतं. तिघेही दिवस-रात्र मेहनत घेऊन काम करत होते. एके दिवशी हे तिघे काम करत असताना तेथे एक यात्रेकरू आला. त्यानं शेजारी दगडांवर केलेलं सुंदर कोरीव काम पाहून उत्सुकतेनं पहिल्या कारागिराला विचारलं, 'तुम्ही काय करत आहात?' त्या कारागिरानं रागानं प्रवाशाकडे पाहिलं आणि म्हणाला, 'आंधळे आहात काय? दिसत नाही मी काम करतोय?' त्याचं उत्तर ऐकून आश्चर्यचकित होऊन यात्रेकरून पुढं जाऊन दुसऱ्या कारागिराला तोच प्रश्न विचारला. तो कारागिर रागावला नाही पण म्हणाला,' काय करणार, पापी पेट का सवाल है. पोटासाठी काय काय करावं लागतं बाबा?'

**जिज्ञासा**
## सुरक्षित स्फोटकांचा शोध
आल्फ्रेड नोबेल हे रसायनशास्त्राचे मोठे शास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांनी आपल्या गडगंज संपत्तीच्या व्याजातून पाच नोबेल पारितोषिके देण्याची इच्छा व्यक्त केली असल्यामुळे दरवर्षी ही पारितोषिके त्यांच्या नावाने दिली जातात. तेच नोबेल पारितोषिक या नावाने ओळखले जातात. जगभरात अतिशय प्रतिष्ठीत असे हे पारितोषिक मानले जाते. आल्फ्रेड नोबेल यांनी काही रासायनिक स्फोटकांची निर्मिती केली. ही स्फोटके सुरक्षित म्हणजेच योग्य तेव्हा आणि हवा तेवढाच स्फोट करण्यासाठी योग्य ठरावित म्हणून त्यांनी खूप अभ्यास केला आणि भरपूर प्रयोग केले. अतिशय चिकाटीने संशोधन करत असताना त्यांनी सुरक्षितपणे हाताळता येतील अशा बऱ्याच रासायनिक स्फोटकांची निर्मिती केली. ट्राय नायट्रो ग्लिसरीन हे स्फोटक मुळात द्रवस्थितीत होते. ते घन स्वरूपात आणण्यासाठी त्यांनी बर्लिनजवळील किसेलगुहर नावाची विशिष्ट माती वापरली. यामुळे द्रव घनरुपात आले आणि ते हाताळणे सोपे झाले.

**सामान्यज्ञान**
## दोस्ती संगणकाशी
एक्सपीमध्ये फाईल झिप कशी करायची हे आपण पाहिले. याशिवाय विनझिप नावाचे सॉफ्टवेअर संगणकावर डाऊनलोड करून त्याद्वारेही फाईल साईज कमी करता येते. 'गुगल'वर सर्च केल्यास हे सॉफ्टवेअर मोफत स्वरुपात उपलब्ध होईल. पण बरेचदा अशा प्रकारे झिप करूनही फाईलचा साईज आपल्याला हवा तितका कमी होत नाही. अशा वेळी 'विनरार (आरएआर)' हे सॉफ्टवेअर कामी येऊ शकेल. या सॉफ्टवेअरद्वारे झिपपेक्षाही अधिक प्रमाणात फाईलचा साईज कॉम्प्रेस होतो. (क्रमशः)

**सोडवा सुडोकू**
सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५१९**

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | |
| | 2 | | |
| 1 | | 2 | 4 |
| | | 3 | |

**क्रमांक ५१८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 2 | 3 |
| 2 | 3 | 4 | 1 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 3 | 2 | 1 | 4 |

**हास्यविनोद**



दररोज वाढणाऱ्या महागाईमुळे त्रासलेल्या गणपतरावांचा गण्याने ५०० रुपयांचे चप्पल आणलेले पाहून आणखीनच पारा चढला होता. गण्या बाहेरून घरात येताच त्यांनी त्याला फैलावर घेतले. गणपतराव म्हणाले, तुला अक्कल आहे का जरा तरी? अरे मी पाच रुपये देऊन किराणा, दूध, अंडी आणि पाव आणायचो. '' गण्या म्हणाला, 'बाबा आता ते शक्य नाही. कारण आता सगळ्या दुकानांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. त्यामुळे आता तुम्ही तसं केलंत तर आतमध्ये जाल.

**आजीबाईचा नातू :** आजी, रेल्वेच्या एका तिकिटाचे दोनशे रुपये सांगत आहेत.
**आजी :** बाळा, अरे इथे किती तरी खिडक्या दिसताहेत, दोन-चार ठिकाणी चौकशी कर, कुणी तरी कमी किमतीला देईल बघ !

**महिलायन**
## मुलांना ॲलर्जीचा त्रास आहे ?
सध्या ऋतू बदलण्याची प्रक्रिया सुरू आहे. सकाळी खूप जास्त थंडी वाजते तर दुपारी गरम होते. अशा विरुद्ध तापमानामध्ये हवेतील विषाणुंची संख्या वाढते आणि त्यामुळे आजाराचे किंवा ॲलर्जीचे प्रमाण वाढते. लहान मुलांना तर या दिवसांत ॲलर्जीचा त्रास होण्याची शक्यता थोडी जास्तच असते. या वातावरणाचा मुलांना त्रास होऊ नये म्हणून थोडीशी देखभाल केली तर बराच फरक दिसून येतो. मुलांना ॲलर्जीचा त्रास होत आहे हे समजण्यासाठी काही लक्षणे जाणून घेऊ. मुलांच्या नाकातून पाणी येणे, नाक बंद होणे किंवा लागोपाठ शिंका येणे. यामध्ये श्वास घेण्यासाठी त्रास होऊ शकतो. श्वास घेताना अडथळा येऊ शकतो किंवा श्वास अडकू शकतो. या त्रासाला स्लीप ॲप्नीया असेही म्हणतात. धाप लागणे, मुलांचे शरीर गरम होणे किंवा ताप येणे, डोळे लाल होणे हीदेखील ॲलर्जीचीच लक्षणे आहेत. ॲलर्जीमुळे कान दुखू लागतो किंवा त्यातून पाणी वाहू लागते. खाण्यातील काही पदार्थांमुळे ॲलर्जी झाली असल्यास डायरीयाही होऊ शकतो. अशा परिस्थितीत विशेष काळजी घेणे आवश्यक असते. घरात असणाऱ्या धूळ, धूर, झुळर यांसारख्या गोष्टींमुळे ॲलर्जी होऊ शकते. म्हणूनच गादीवरच्या चादरीपासून उशीची खोळ किंवा तत्सम कापडाच्या वस्तू रोज बदलणे गरजेचे असते. मुलांचे कपडे, पांघरूण इत्यादी गोष्टीदेखील तेवढ्याच स्वच्छ ठेवाव्यात. आठवड्यातून उन्हात एकदा जरूर ठेवाव्यात. अलीकडच्या काळात ज्या गोष्टीपासून ॲलर्जी आहे ती ओळखण्यासाठी ॲलर्जेन स्पेसिफिक आयजीई ही रक्ताची (उत्तरार्ध)

**पक्षीविश्व**
## पेन्टेड स्टॉर्क
तसेच बेडूक, गोगलगाय, हे प्राणीही त्यांना आवडतात. भक्ष्य शोधताना हे पक्षी मोठी युक्ती वापरतात. आपले डोके पाण्यात ठेवतात आणि चाच थोडीशी उघडी ठेवतात. सावज सापडलं की पटकन चोचीत पकडतात. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, चीनचा पुढील भाग, व्हिएतनाम या ठिकाणी हे पक्षी आढळतात. थायलंडमध्येही काही प्रमाणात ते बघायला मिळतात. या पक्षाची घरटी काठ्यांनी आणि पानांनी बांधलेली असतात. अंड्यामधून पिले बाहेर आल्यानंतर काही महिने आईच त्यांना भरवत असते. नंतर अठरा महिन्यांनी ही पिले आपल्या आई-वडिलांना आकृष्ट करण्यासाठी किंवा त्यांचे लक्ष वेधण्यासाठी विशिष्ट प्रकारचा मोठा आवाज काढतात. जलाशयावर उडणारे हे पक्षी फार सुरेख दिसतात. (उत्तरार्ध)

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षाला जोरदार फटका

# उद्धव ठाकरेंच्या अस्तित्वाचाच प्रश्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई, ठाणे जिल्ह्यानंतर शिवसेना विशेषतः हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंचा बालेकिल्ला कोणता असेल तर तो म्हणजे छत्रपती संभाजीनगर म्हणजेच औरंगाबाद आहे. या जिल्ह्याला नवीन ओळख बाळासाहेब ठाकरेंनीच दिली. सुरुवातीला अनेक वर्षं नामांतर करण्याचा मुद्दा प्रत्येक निवडणुकीत गाजला. मात्र ज्यावेळी शहराची ओळख बदलली, त्यानंतर ठाकरे नावाचं वलय घट्ट होण्याऐवजी ते अक्षरशः नामशेष झालंय का? असा प्रश्न निर्माण झालाय. कारण २०२४ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पक्षाचे नाव आणि चिन्हाचा करिष्मा कायम असला तरी ठाकरे नावाचा दबदबा मात्र नामशेष झालाय. २५ वर्षांत पहिल्यांदाच ठाकरेंच्या राजकीय अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालाय.

छत्रपती संभाजीनगर म्हटलं की स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंच्या आवडीचे आणि हक्काचे शहर मानले जाते. त्यांना या जिल्ह्यातील मतदारांनी असीम प्रेम दिले. त्यामुळे २५ वर्षं लोकसभा, विधानसभा, महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजपाच्या मदतीने सत्तेची फळ शिवसेना पक्षाने चाखली. त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र उद्धव ठाकरे यांनादेखील तसाच किंबहुना थोडा अधिकचा जनाधार मतदारांनी दिला. त्यामुळेच २०१९ विधानसभा निवडणुकीत नऊ मतदारसंघांत ६ जागांवर शिवसेना आणि ३ जागांवर भाजपा विजयी झाला. मागील २५ वर्षांत सर्वाधिक जागा निवडून आल्याने सेनेची ताकद घट्ट झाली असं वाटत असताना राजकीय भूकंप झाला आणि पक्षाची वाताहत झाली. पक्षात फूट पडल्यावर २०२४ मधील निवडणुकीत पक्षाच्या नावाला, चिन्हाला तेच प्रेम मिळाले, मात्र बाळासाहेबांचे पुत्र असलेल्या उद्धव ठाकरे यांना मात्र मतदारांनी नाकारले.

ठाकरे नावाचं वलय छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात वाढत असताना त्यावेळचे पक्षातील बडे नेते एकनाथ शिंदेंनी बंड केलंय. त्यावेळी जिल्ह्यातील सहापैकी पाच आमदार त्यांच्यासोबत गेले. त्यामध्ये एकनिष्ठ आणि अनुभवी असलेले आमदार संदीपान भुमरे, संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल यांच्यासह काँग्रेसमधून पक्षात आलेले अब्दुल सत्तार आणि पहिल्यांदाच आमदार झालेले रमेश बोरनारे यांचा समावेश होता. त्यात एकमेव कन्नडचे उदयसिंग राजपूत हे आमदार ठाकरे यांच्यासोबत राहिले.

लोकसभा निवडणुकीत ठाकरे नावाचा करिष्मा कायम राहील, असं वाटत असताना लोकसभा निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे संदीपान भुमरे यांनी धनुष्यबाण चिन्हावर विजय मिळवत शिवसेनेचा दबदबा कायम ठेवला. मात्र पक्षाची मुख्य ताकद असलेल्या ठाकरे नावाचे वलय असलेल्या गटाचे उमेदवार चंद्रकांत खैरे तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले. विधानसभा निवडणुकीत वेगळी परिस्थिती असेल, असा विश्वास ठाकरे गटाचे नेते बोलत असताना शिंदेंच्या पाच शिलेदारांनी त्यांचे गड राखलेच, मात्र ठाकरे गटाच्या ताब्यात असलेली एकमेव जागादेखील आपल्या ताब्यात घेतली.

## डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त सुट्टी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांना ही सुटी लागू राहणार आहे. बुधवारी या सुटीचे परिपत्रक काढण्यात आले.

मुंबईतील चैत्यभूमी परिसरात महापरिनिर्वाण दिनानिमित्त जय्यत तयारी सुरु आहे. ६ डिसेंबर रोजी राज्यभरातून मोठ्या संख्येने चैत्यभूमी येथे अनुयायी येतात. दरम्यान, त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी सार्वजनिक सुट्टीचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार, शुक्रवारी मुंबईतील शाळा आणि महाविद्यालये बंद राहणार असून दादर-वरळी परिसरात २ दिवस ड्राय-डे घोषित करण्यात आला आहे.

» Selected

## ठाण्यात गावठी हात बॉम्ब सापडले

**ठाणे** : ठाणे शहरात गावठी हात बॉम्बचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी रायगड येथील माणगाव भागातील एका तरूणाला ताब्यात घेतले असून पोलिसांनी त्याच्याकडून १० हात बॉम्ब जप्त केले आहेत. त्याच्या इतर साथिदारांचा पोलीस शोध घेत आहेत. हे गावठी हात बॉम्ब रान डुकरांच्या शिकारीसाठी वापरले जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. साकेत रोड परिसरात एकजण गावठी हात बॉम्ब घेऊन येत असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, गुन्हे अन्वेषण शाखेच्या मध्यवर्ती शोध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या पथकाने सापळा रचला. त्यांच्या पथकासोबत बॉम्ब शोधक आणि नाशक पथक, श्वान पथक होते. या पथकाने साकेत परिसरात फिरणाऱ्या या संशयित तरूणाला ताब्यात घेतले. त्याच्या बॅगेची तपासणी केली असता, बॅगमध्ये १० हात बॉम्ब आढळून आले. त्याने हे हात बॉम्ब सातारा येथून आणल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याची माहिती पोलिसांनी दिली.




## दहशतवाद्याची सर्वोच्च न्यायालयात याचिका

# इसिसवरचा दहशतवादी उल्लेख काढा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया आणि इतर दहशतवादी संघटनेचा उल्लेख काढून टाकण्याची मागणी करणाऱ्या इसिसचा कथित भारतप्रमुख आणि दहशतवादी साकिब नाचन याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सुनावणी झाली. या संघटनांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित करणाऱ्या दोन सरकारी अधिसूचना रद्द करण्याची मागणी नाचन याने केली. नाचन यापूर्वीही दहशतवादी घटनांमध्ये सहभागी होता आणि सध्या तो इसिसशी संबंध आणि भारतविरोधी कारवायांसाठी तुरुंगात आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. तिहार कारागृहात असलेल्या साकिब नाचन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात उपस्थित होता.

राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये देशातील इसिसच्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला होता आणि साकिबला या प्रकरणातील मुख्य आरोपी बनवले होते. त्याच्यावर देशभरात इसिस मॉड्यूल चालवणे आणि तरुणांना दहशतवादी संघटनेत भरती केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात एनआयएने साकिब नाचन यांच्यासह हसीब जुबेर मुल्ला, काशिफ अब्दुल सत्तार बलेरे, सैफ अतीक नाचन, रेहान अशफाक सुस, शग्फ सफीक दिवकर, फिरोज दस्तगीर कुआरी यांच्यासह अनेकांवर आरोपपत्र दाखल केले होते.

साकिब नाचनला डिसेंबर २०२३ मध्ये अटक करण्यात आली होती. तो स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या बंदी घातलेल्या संघटनेचा पदाधिकारी असून, यापूर्वी दोन दहशतवादी खटल्यांमध्ये त्याला दोषी ठरवण्यात आले आहे. २००२-०३ मध्ये मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक, विलेपार्ले आणि मुलुंड बॉम्बस्फोटातही त्याचा सहभाग होता.

## हिंदू सेनेने केली मागणी

# जामा मशिदीचे सर्वेक्षण करा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्लीतील जामा मशिदीच्या पायऱ्यांवर हिंदू मंदिरांचे अवशेष असल्याचा दावा करून मशिदीचे पुरातत्त्व सर्वेक्षण करावे, असे पत्र भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास (एएसआय) लिहिण्यात आले आहे.

दिल्लीतील जामा मशिदीचे सर्वेक्षण करण्याची मागणी करणारे पत्र एएसआयच्या महासंचालकांना लिहिले आहे. मुघल आक्रमक औरंगजेबाने जोधपूर आणि उदयपूरची कृष्ण मंदिरे उद्ध्वस्त करून दिल्लीतील जामा मशिदीच्या पायऱ्यांवर त्यांची मूर्ती बसवली होती, असे म्हटले जाते. साकी मुस्ताक खान यांचे औरंगजेबावरील मसिर-ए-आलमगिरी हे पुस्तक यावर आधारित आहे. हिंदू सेना या संघटनेचे प्रमुख विष्णु गुप्ता यांनी हे पत्र लिहिले आहे.

विष्णू गुप्ता यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे की, जोधपूर आणि उदयपूरमधील शेकडो मंदिरे पाडल्यानंतर औरंगजेबाने हिंदूंचा अपमान करण्यासाठी त्यांचे अवशेष दिल्लीतील जामा मशिदीच्या पायऱ्यांवर बसवले. जामा मशीद एएसआयच्या नियंत्रणाखाली असून त्यामागील सत्य शोधण्यासाठी त्यांनी सर्वेक्षण करावे. मशिदींच्या पायऱ्यांखाली गाडलेले मंदिरांचे अवशेष पाहून हिंदूंच्या भावना दुखावल्या जातात. दिल्लीतील जामा मशिदीचे एएसआय सर्वेक्षण करून त्या मूर्ती बाहेर काढून मंदिरांमध्ये स्थापित कराव्यात, अशी हिंदू सेनेची इच्छा आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून मुघल आक्रमक औरंगजेबाच्या क्रौर्याचे आणि मंदिरांच्या विध्वंसाचे सत्यही जगासमोर येणार आहे, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## आसाममध्ये गोमांसवर राज्यात पूर्ण बंदी; सरमा यांची घोषणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी बुधवारी राज्यातील गोमांस सार्वजनिक वापरावर पूर्णपणे बंदी घालण्याची घोषणा केली. यात रेस्टॉरंट्स यांचा समावेश आहे.

आदल्या दिवशी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सरमा म्हणाले की, काँग्रेस नेत्यांच्या अलीकडच्या काही विधानांवर झालेल्या चर्चेमुळे हे पाऊल उचलण्यात आले. मतदारांना गोमांस देऊन आकर्षित करण्याचा आरोप काँग्रेसने केला होता.

## १९ तारखेला फेरपरीक्षा

# नाशिकमध्ये पेपरफुटी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा एमबीबीएस द्वितीय वर्षाचा फार्माकोलॉजी-१ विषयाचा पेपर मंगळवारी परीक्षेच्या तासभर आधीच सोशल मीडियावर फुटला. विद्यापीठाला याची माहिती मिळताच पेपर तत्काळ रद्द करून या विषयाची फेरपरीक्षा १९ तारखेला ठेवली आहे. या परीक्षेसाठी राज्यातील १०० केंद्रावर ५ हजार ९०० विद्यार्थी पेपर देणार होते. आता चौकशीसाठी विद्यापीठस्तरीय समिती नेमण्यात आल्याचं आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत हिवाळी सत्रातील परीक्षांचा दुसरा टप्पा दोन डिसेंबर पासून सुरू झाला आहे. राज्यातील ५० परीक्षा केंद्रावर १६ डिसेंबर पर्यंत या परीक्षा चालणार आहे. यामध्ये ३ डिसेंबरला दुपारच्या सत्रात एमबीबीएस दुसऱ्या वर्षाचा फार्माकोलॉजी-१ विषयाचा पेपर परीक्षेच्या तासभर आधीच सोशल मीडियावर फुटला. त्यामुळे विद्यापीठामार्फत हा झालेला पेपर ग्राह्य धरला जाणार नाही. तसंच १९ डिसेंबरला पुन्हा या विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. यासंदर्भात कुलगुरू माधुरी कानिटकर यांनी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक घेऊन या प्रकाराची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ नये यासाठी हा पेपर पुन्हा घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

म्हसरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचे आदेशही विद्यापीठाने संबंधित परीक्षा केंद्राच्या प्रमुखांना दिले आहेत, अशी माहिती डॉ संदीप कडू यांनी दिली.

## मणिपूर प्रकरणी चौकशी समितीची मुदत वाढवली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गृह मंत्रालयाने बुधवारी मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराची चौकशी करणाऱ्या तीन सदस्यीय न्यायिक चौकशी आयोगाची अंतिम मुदत वाढवली असून, २० मे पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले. ४ डिसेंबर रोजी जारी केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेत, गृहमंत्रलयाने म्हटले आहे की, "कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट, १९५२ (१९५२ चा ६०) च्या कलम ४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकारने याद्वारे अधिसूचनेमध्ये या सुधारणा केल्या आहेत.




**जॉर्जिया :** येथील तिबिलिसी येथे, युरोपियन युनियनमध्ये सामील होण्याच्या चर्चेला स्थगिती देण्याच्या सरकारच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षांच्या समर्थकांनी रॅली काढली असता, पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अडथळे उभारले.

## ११७ कोटींच्या फसवणूक प्रकरणी सीबीआयची छापेमारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** ११७ कोटी रुपयांच्या आंतरराष्ट्रीय सायबर फसवणुकीप्रकरणी सीबीआयने बुधवारी दिल्ली आणि आसपासच्या परिसरात १० ठिकाणी छापे टाकले. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरकडून (आयफोरसी) मिळालेल्या तक्रारीच्या आधारे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली.

अज्ञात संघटित सायबर गुन्हेगार आणि परदेशी घटक भारतात संघटित आर्थिक फसवणूक करत असल्याचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. परदेशी भामटे भारतीय नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी वेबसाइट, व्हॉट्सअॅप आणि टेलिग्राम सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करतात, असे तपासात समोर आले आहे. हे भामटे पार्ट टाईम नोकरी, टास्कबेस्ड फ्रॉड आणि सुरुवातीच्या गुंतवणुकीवर जास्त परताव्याची खोटी आश्वासने देऊन लोकांना अडकवतात, असे आढळून आले आहे.

पैशांचा स्त्रोत सापडत नाही म्हणून पीडितांनी जमा केलेले पैसे तातडीने बेनामी खात्यांद्वारे हस्तांतरित केले जातात. या छाप्यांमध्ये गुरुग्राममधील दोन आणि राष्ट्रीय राजधानीतील आठ ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. या ठिकाणांहून इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि आर्थिक नोंदी असे महत्त्वाचे पुरावे सापडले आहेत. या

## हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध

# बांगलादेशींना प्रवेश न देण्याचा त्रिपूरात निर्णय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**त्रिपुरा :** बांगलादेशात हिंदूवरील अन्याय-अत्याचाराविरोधात आता त्रिपुरा येथील हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनने निषेध व्यक्त केला आहे. त्रिपुरा येथील हॉटेल मालकांनी आता निर्णय घेतला आहे. ते राज्यातील कोणत्याही बांगलादेशींनी हॉटेलमध्ये राहण्यासाठी खोल्या देणार नाही आणि रेस्टॉरंटमध्ये सुविधा देणार नाहीत. मी कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही, असे त्यांनी म्हटले होते, मात्र आता परिस्थिती गंभीर असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

काही दिवसांपासून बांगलादेशात भारतीय राष्ट्रध्वजाचा अवमान आणि हिंदूवरील होणाऱ्या छळामध्ये वाढ निर्माण झाली असल्याचे हॉटेल मालकांचे म्हणणे आहे. त्यांनी या बांगलादेश सरकारच्या वृत्तीवर टीका केली आहे. बांगलादेशातील नागरिकांना राज्यातील हॉटेलसेवा दिली जाणार नाही, असा निर्णय घेतला आहे.

महत्त्वपूर्ण बाब म्हणजे त्रिपुरा येथे ८५६ किमी सीम ही बांगलादेशी असून दरवर्षी मोठ्या संख्येने बांगलादेशी याठिकाणी उपचारासाठी आणि शिक्षणासाठी भारतात येत असतात. यामुळे हॉटेल मालकांनी बांगलादेशींवर टाकलेल्या बहिष्काराचा बांगलादेशींवर मोठा परिणाम होणार आहे.

# छत्तीसगडमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमध्ये बुधवारी सकाळी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. तेलंगणातही भूकंपाचे धक्के जाणवले. छत्तीसगडच्या दक्षिण बस्तरमध्ये पहिल्यांदाच भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.३ इतकी नोंदवली गेली.




दक्षिण बस्तरमधील दंतेवाडा, सुकमा आणि विजापूर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले. त्यानंतर लोक घाबरून घराबाहेर पडले. दक्षिण बस्तरमध्ये पहिल्यांदाच भूकंपाचे धक्के जाणवल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू शेजारच्या तेलंगणात होता, असे वृत्तसंस्थेने म्हटले आहे. हैदराबादहून मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणातील मुलुगू जिल्ह्यात सकाळी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने (एनसीएस) दिलेल्या माहितीनुसार, हैदराबाद, रंगा रेड्डी, वारंगल, सिद्दीपेट, हनुमानकोंडा आणि खम्मम सह तेलंगणातील विविध जिल्ह्यांमध्ये सकाळी ७.२७ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. गेल्या २० वर्षांत राज्यात पहिल्यांदाच एवढा तीव्र भूकंप झाला आहे, अशी माहिती तेलंगणातील हवामान शास्त्रज्ञांनी दिली.

# गाझीपूर सीमेवर राहुल गांधींना रोखले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**गाझियाबाद :** गाझीपूर सीमेवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना अडवण्यात आले. ते संभल येथे जाण्यासाठी निघाले असता, पोलिसांनी त्यांना तेथे जाण्यापासून रोखले. संभलमध्ये जमावबंदी लागू असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बुधवारी गाझीपूर सीमेवर जिल्ह्यात जाताना रोखण्यात आले.

राहुल गांधी म्हणाले की, ते पोलिसांसोबत संभलला एकट्याने जाण्यास तयार आहेत, पण त्यांना परवानगी देण्यात आली नाही. विरोधी पक्षनेते या नात्याने हा माझा घटनात्मक अधिकार आहे. मला परवानगी द्यायला हवी होती, असेही ते म्हणाले.

राहुल गांधी यांच्यासोबत वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वाड्राही होत्या.

राहुल गांधी, प्रियांका गांधी वढेरा आणि काँग्रेसचे इतर वरिष्ठ नेते सकाळी गाझीपूर सीमेवर पोहोचले, तिथे त्यांना संभलमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आणि बॅरिकेड्स लावण्यात आले.

## देशभरात १८ राज्यांमध्ये सत्तेत, डझनापेक्षा जास्त मुख्यमंत्री

# लोकसभेनंतर विधानसभेत भाजपचे जोरदार कमबॅक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. मात्र, त्यानंतरच्या ४ राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने मोठे यश मिळवले आहे. हरियाणा आणि महाराष्ट्रात भाजपचा मुख्यमंत्री झाला आहे. त्यासोबतच जम्मू-काश्मीर आणि झारखंडमध्येही पक्षाने चांगली कामगिरी केली आहे. यामुळे आता भाजप देशभरातील सुमारे डझनभराहून अधिक मुख्यमंत्री झाले आहेत. तर १८ राज्यांमध्ये भाजप सत्तेत आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा मुख्यमंत्रीपदासाठी झाली असून, आता महाराष्ट्रातही भाजप सत्तेत आणि भाजपचा मुख्यमंत्री असेल. महाराष्ट्राच्या अगोदर झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीतही भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळे नायब सिंह सैनी यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यात आले. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर गेल्यावर्षी मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या राज्यांमध्ये निवडणुका झाल्या. या तिन्ही राज्यांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले त्यामुळे तिन्ही राज्यांची सत्ता आणि मुख्यमंत्री भाजपचे आहेत. मोहन यादव मध्य प्रदेशचे, भजनलाल शर्मा राजस्थानचे तर विष्णू देव साय छत्तीसगडचे मुख्यमंत्री आहेत.

यासोबत उत्तर प्रदेशात उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री आहेत. योगी आदित्यनाथ २०१७ मध्ये मुख्यमंत्री झाले आणि ते सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री आहेत. भूपेंद्र पटेल हे गुजरातचे विद्यमान मुख्यमंत्री आहेत. गुजरातमध्ये १९९८ पासून सातत्याने भाजपचे सरकार आहे. देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: सलग तीन वेळा येथील मुख्यमंत्री राहिले आहेत. महाराष्ट्राच्या शेजारील राज्य असलेल्या गोवा राज्यात एनडीएची सत्ता आहे. तिथे भाजपचे प्रमोद सावंत मुख्यमंत्री आहेत. प्रमोद सावंत हे सलग दुसऱ्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री आहेत.

१४७ विधानसभा जागा असलेले ओडिशाचे विद्यमान मुख्यमंत्री भाजपचे मोहन चरण माझी आहेत. त्यांनी १२ जून २०२४ रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आसाममध्ये भाजपची सत्ता असून तिथे हेमंता बिस्व शर्मा मुख्यमंत्री आहेत. तर उत्तराखंडमध्ये भाजपचे पुष्कर सिंह धामी मुख्यमंत्रीपदावर विराजमान आहेत. मणिपूरमध्येही भाजपची सत्ता असून बिरेन सिंह मुख्यमंत्री आहेत. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री भाजपचे पेमा खांडू आहेत. मेघालय, नागालँड आणि त्रिपुरामध्ये एनडीए आघाडीची सरकारे आहेत.

# हेल्थ प्लस

## नोंद

### जास्वंदाचा चहाही आरोग्यदायी

जास्वंद किंवा हिबीकस ट्री हे पारंपरिक औषध आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जास्वंदीचा चहा आपल्याकडे तो वापरला जातो. त्यात भरपूर अँटी ऑक्सिडंटस असतात ज्यामुळे रक्तदाब कमी ठेवण्यास मदत होते. जास्वंदीच्या पाकळ्यांपासून काढलेल्या अर्कापासून हा चहा तयार केला जातो. तो गरम किंवा थंड करूनही प्यायला जाऊ शकतो. जगातील अनेक लोकांच्या जीवनशैलीचा भाग आहे हा चहा. हा चहा आरोग्यासाठी चांगला असतो. जास्वंदीच्या चहातील अँटीऑक्सीडंट गुणधर्म यकृताच्या आजारांवर फायदेशीर ठरतात. शरीराच्या उती आणि पेशी यांच्यातील फ्री रॅडीकल्सला निष्फळ करण्यासाठी अँटीऑक्सीडंटस मदत करत असल्यानं आपल्या शरीराचे रोगांपासून संरक्षण होते

## हेल्दी टिप्स



वडीलधारी माणसे हरभरे खाणाऱ्यांचे शरीर निरोगी आणि बलवान होते असे सांगत असतात. चणे खाल्ल्याने मेंदू तल्लख होते. चण्यांमध्ये कार्बोहायड्रेटस्, प्रोटिन, स्निग्धता, फायबर्स, कॅल्शियम, लोह आणि अनेक जीवनसत्वे असतात. गर्भवतीला मळमळत असेल तर भाजलेल्या हरभऱ्याचे कढण पाजावे. चण्यांमुळे रक्तशुद्धी होते. तसेच केसगळती रोखण्यास मदत होते.




नारळपाण्याने आतडी साफ राहते. किडनीशी संबंधित आजारांमध्ये नारळपाण्याचे सेवन करणे अत्यंत लाभदायक ठरते. गॅसेस अथवा ॲसिडिटी झाल्यास नारळ पाणी प्यायल्याने फरक पडतो. नारळपाण्यात पोटॅशियम तसेच मिनरल अधिक प्रमाणात असल्याने हे पाणी उलटी, जुलाबाने होणारे डीहायड्रेशन रोखते.



दातदुखीमध्ये वाटलेले मीठ आणि मोहरीचे तेल मिसळून दातांवर चोळल्यास दात स्वच्छ तर होतातच, शिवाय दातांच्या वेदनाही दूर होतात. हातापायात वेदना होत असल्यास मोहरीच्या तेलाने मालीश करावी. डोकेदुखीमध्येही मोहरीच्या तेलाने मालीश केल्यास फायदा होतो. कानामध्ये मळ झाल्यास तसेच कानामध्ये वेदना होत असल्यास मोहरीचे तेल कोमट करुन कानात टाकावे. यामुळे शीघ्र लाभ होतो.



तिळात तांबे, मँगेनीज, कॅल्शियम, आयर्न, फॉस्फरस, व्हिटॅमिन बी-१ आणि झिंक यांचे प्रमाण भरपूर असते. तिळाच्या सेवनाने हाडांची क्षमता वाढते. तीळामुळे मायग्रेन आणि रजोनिवृत्तीनंतर येणारी उदासीनता रोखता येते. वात न होणे, रक्त शुद्ध होणे आदी कार्ये तिळामुळे साधली जातात. तसेच श्वसनापासून होणारे आजार आणि मधुमेह नियंत्रणात राहण्यासही मदत होते.



पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्वे आणि क्षार वजन घटविण्यास साहायक आहेत. याच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. त्यामुळे वजन घटण्यास मदत होते.

## समस्या 'टेक्स्ट नेक'ची

आधुनिक जग त्यातील वस्तू आणि त्या वापरण्याची आपल्या चुकीच्या पद्धती यांमुळे आता नव्या व्याधी जन्माला येऊ लागल्या आहेत. मोबाईल फोन ही अशीच आधुनीक काळाची देणगी आणि आधुनिक काळाची गरज. पण ही काळाची गरज आता काळजीची कारण ठरतेय. होय आपल्या मोबाईल फोनकडे पाहण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे मणक्याचे आजार जडायला सुरुवात झाली आहे. या आजाराला टेक्स्ट नेक असे म्हटले जाते. मोबाईलवर सतत व्यस्त असणारे लोक मान खाली घालून सतत एकटक काम करताना दिसतात त्यामुळे मानेतील मणक्यांच्या हाडांची ठेवण चुकते. हा आजार कदाचित भविष्यात गंभीर रुपही प्राप्त करु शकतो.

मोबाईलच्या वाढत्या वापराने टेक्स्ट नेक हा आजार झपाट्याने वाढताना दिसतोय. गोंधळून जाऊ नका. आपण मोबाईल पाहताना वापरताना दोन्ही हातात धरतो आणि मान खाली वाकवूनच त्यावर काम करत राहतो. त्यामुळे मानेवरील ताण वाढण्यास आता मोबाईल कारणीभूत व्हायला लागले आहेत. गेल्या काही दिवसांत याचे प्रमाण वाढल्याचे दिसते आहे. त्यामुळे मानेच्या हाडांची झीज होऊन मानेचे हे दुखणे बरे करण्यासाठी शस्त्रक्रियेचा आधारही घ्यावा लागू शकतो. फोनमध्ये डोके खूपसून बसणाऱ्या कित्येक व्यक्ती आपल्याला पहायला मिळतात. त्यामुळे पाठीच्या वरच्या बाजूच्या दुखण्याच्या तक्रारींत वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. ही पाठदुखी भविष्यात गंभीर रुप धारण करुन पाठीच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो.



**परिणाम :** बैठ्या जीवनशैलीचेही काही परिणाम होताना दिसतात जे पुढे गंभीर होऊ शकतात. अर्थात ही खाली वाकून पाहण्याची काम करण्याची स्थिती काही अगदी आत्ताची नाही तर पण ही पारंपरिक पद्धतच म्हणायला हवी. कारण अभ्यास करताना, वाचन करतानाही आपण याच पद्धतीने बसत आलो वाचत आलो.

आपण मोबईलवर मेसेज टाईप करत असतो तेव्हा एकाच वेळी अनेक गोष्टी सुरु असतात आणि मुख्य म्हणजे बराच काळ लोक त्या गोष्टी सातत्याने करत असतात. पण जर हे आपण करत आलो आहोत तर एवढ्या काळजी कारण काय असा प्रश्न साहजिकच पडतो.

नव्या पिढीत मोबाईलचा वापर खूप लहान वयातच वाढला आहे आणि लहानपणापासूनच्या सवयी मुळे त्यांच्या कण्याला कायमस्वरुपाची इजा किंवा दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कायमस्वरुपाचे मानेचे दुखणे मुलांना सहन करावे लागू शकते.

● **चुकीची मुद्रा**

अनेकदा फोन पाहात असताना कित्येक तास कुबड काढून बसल्याने हा त्रास होतो. पर्यायाने डोकेदुखी, मानदुखी, हात दुखी आणि बधीरपणा असे त्रास होऊ शकतात. नेहमीच्या उभे राहण्याच्या पद्धतीमध्ये मान आणि पाठ ही सरळच राहात असते. त्यामुळे मान आणि पाठी हा कणा सरळ राहात असतो. पण जेव्हा आपण मान खाली करुन खूप वेळ पाहात राहतो तेव्हा मान पाठ आणि कणा या सगळ्यांवरच त्याचा ताण येतो.



रक्तातील लोहाची कमतरता म्हणजेच आयर्न डिफिशियन्सी ही आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकते. दुर्दैवाने, याकडे आजही गांभीर्याने पाहिले जात नाही. विशेषतः कुटुंबाचा गाडा ओढणाऱ्या महिला व तरुणींमध्ये ॲनिमियाचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढत चालले आहे.

## 'आधी आबादी' ॲनिमियाग्रस्त

विशेषतः महिलांमध्ये अधिक असून येते. या स्थितीला 'ॲनिमिया' असे म्हटले जाते. युवा महिला वर्गात आयर्नची म्हणजेच लोह तत्त्वाची कमतरता वाढू लागली आहे. २१ वर्षांपर्यंतच्या १७ टक्के महिला किंवा तरूणींमध्ये लोहाची कमतरता दिसून आली.

अमेरिकेत पन्नास वर्षांखालील ३५ टक्के, तर भारतात ५२ टक्के महिला ॲनिमियाने पीडित आहेत.

आयर्नची कमतरता असलेल्या महिलांमध्ये थकवा जाणवतो, चिडचिडेपणा येऊ लागतो; परंतु या गोष्टी जीवनाचा एक भाग असल्याने मानून महिला त्याकडे दुर्लक्ष करतात, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालात म्हटले आहे.

ही स्थिती आणखी काही काळ राहिल्यास त्याचे रूपांतर तणाव, वैफल्य तसेच हृदयासंबंधी विकारात होऊ शकते. तांबड्या रक्तपेशींचे प्रमाण राखण्यात आयर्नची महत्त्वाची भूमिका असते.

आयर्न कमी असल्यानंतर शरीराची ऊर्जा या पेशींची क्रिया सुरळीत राहावी यावर अधिक खर्च होते. हृदय, मेंदू आण हृदयाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. एकूणच आरोग्यावर विपरीत परिणाम करणारी ठरते.

आयर्नची कमतरता दर्शवणारी काही लक्षणे आहेत. श्वास घेण्यात अडचण, विचारांत अस्पष्टता, थकवा, चक्कर येणे, थंड तापमानाबद्दलच्या संवेदनशीलतेत वाढ, हृदयाच्या ठोक्यात अनिश्चितता, इत्यादी त्याची लक्षणे असतात.

आहारात सफरदचंद, बीट, पालक, डाळिंब यांचा समावेश करणे गरजेचे असते. तसेच अंडी, मासे, डाळी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचाही आहारात समावेश असावा, असे तज्ज्ञ सांगतात.

## हिवाळ्यात अंग खाजतेय?

हिवाळ्याच्या दिवसात अनेक जणांना अंगाला खाज सुटण्याची समस्या जाणवते. अनेकदा त्वचा कोरडी पडल्यामुळे अंग खाजते. पण काहींना अंगाला नियमित मॉईश्चरायजर लावूनही खाजण्याचा त्रास होतो. अलीकडेच शास्त्रज्ञांनी याचे उत्तर शोधून काढले आहे. मेडिकल जर्नल सेलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनात एक्जिमाशी संबंधित बॅक्टेरिया आणि खाज निर्माण करणाऱ्या एन्झाइम्समधील संबंध आढळून आला आहे.

या संशोधनात असे दिसून आले आहे की खाज सुटण्याचे मुख्य कारण म्हणजे बॅक्टेरिया. वास्तविक, एक्जिमा हा त्वचेशी संबंधित आजार आहे. यामध्ये आपल्या त्वचेवर काही ठिपके तयार होतात, ज्यात सूज येण्यासोबतच लालसरपणा येतो आणि खाजही सतत जाणवते. ही खाज कधीही येते आणि ही समस्या वाढतच जाते.



शास्त्रज्ञांना असे आढळले आहे की एस. ऑरियस त्वचेला व्ही८ प्रोटीन नावाचे एन्जाइम जोडते. यामुळे खाज निर्माण करणाऱ्या न्यूरॉन्स सक्रिय होण्यास मदत होते. एस. ऑरियस हे एक प्रकारचे बॅक्टेरिया आहेत, जे त्वचेच्या थरावर आक्रमण करतात आणि अनेक त्वचा रोगांना कारणीभूत ठरतात. त्वचेवर खाज येण्याचे हे मुख्य कारण नसले तरी, खाज येण्यात ती मोठी भूमिका बजावते. एक्जिमा हा त्वचेचा आजार आहे. यामध्ये त्वचा कोरडी होऊन खाज सुटते. त्वचेला खाज सुटते आणि लाल पुरळ दिसू लागतात. हा रोग त्वचेच्या अडथळ्यांचे कार्य कमकुवत करतो. त्यामुळे त्वचेला खाज सुटू लागते. एक्जिमा हा त्वचारोगाचा एक प्रकार मानला जातो. ॲलर्जी, अनुवांशिक कारणे आणि अतिक्रियाशील रोगप्रतिकारक शक्तीमुळे देखील एक्जिमा होऊ शकतो.

## मिमांसा घोरण्याच्या समस्येची

झोपेत घोरण्याची सवय अनेक लोकांना असते. ही सवय सामान्य मानून अनेकजण याच्याकडे दुर्लक्ष करतात परंतु असे केल्याने तुमच्या आरोग्यावर याचा दुष्परिणाम होऊ शकतो. काही लोकांमध्ये ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप एपनिया (ओएसए) हे देखील घोरण्याचे कारण असू शकते. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे की, 'ओएसए'ने त्रस्त असलेल्या लोकांना घशाचा कर्करोग होण्याचा धोका जास्त असतो. पण घोरण्यामागची कारणे नेमकी काय असतात?

●असे मानले जाते की गळ्याचा मागचा भाग संकुचित होतो आणि ऑक्सिजन तिथून जाताना आजूबाजूच्या पेशी कंप पावतात. त्यामुळे घोरणे सुरु होते. घोरण्याची समस्या उद्भवण्यास काही प्रमुख कारणे आहेत.

●झोपण्याच्या पद्धतीत बदलः एका अंगावर झोपण्याची सवय असेल तर ती सवय ताबडतोब बदला. कारण एका अंगावर झोपूनही घोरण्याची समस्या वाढतेच.



●अस्वच्छ नाक : नाक स्वच्छ करूनच झोपावे. कारण आपण नाकाने श्वास घेतो आणि श्वास घेताना अडथळा आला तर व्यक्ती घोरू लागते. काहीवेळा नाकात सूज येणे किंवा नाक बंद पडणे यामुळे घोरणे देखील होऊ शकते. अशा स्थितीत झोपण्यापूर्वी नाकात अणुतेलाचे किंवा गायीच्या साजूक तुपाचे ४ ते ५ थेंब टाकल्यास फरक पडतो.

●गरम पाण्याचे सेवनः गरम पाण्याच्या सेवनाने गळ्याच्या नसा मोकळ्या होतात आणि आपण आरामात झोपू शकतो. त्यामुळे रोज झोपण्यापुर्वी गरम पाण्याचे सेवन जरूर करावे.

●थंड पदार्थांचे सेवन : थंड पदार्थांचे सेवन केल्यास घसा बसतो त्यामुळे घोरणे सुरू होते. त्यामुळे थंड पदार्थांचे सेवन टाळावे.

●औषधांचे अतिसेवन : जास्त जड औषधे आणि झोपेच्या गोळ्या घेतल्यास घोरण्याची समस्या वाढते. खोकल्यावरील औषधांमुळे शरीराच्या स्नायूंना आराम मिळतो आणि त्यामुळेही घोरणे सुरू होते.

●अतिमद्यपानः अति मद्यपानामुळे घोरणे सुरू होते याविषयी बहुतांश लोक अनभिज्ञ असतात. जास्त मद्यपान केले की शरीराचे स्नायू शिथिल होतात ज्यामध्ये घसा आणि जीभ यांचे स्नायू सामील आहेत. त्यामुळे मग घोरण्याचे प्रमाण वाढते.

●स्थूलपणा : जास्त वजनामुळे पेशी जास्त जाड होतात. गळ्याच्या पेशी जास्त जाड होतात त्यामुळे घसा मोकळा होण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे श्वास घेण्यास अडचणी निर्माण होऊन घोरणे सुरू होते.

## हाता-पायांना मुंग्या येताहेत?

सकाळी उठल्यानंतर किंवा काही काळ बसून राहिल्यामुळे हातांना किंवा पायांना मुंग्या येतात. काही वेळा त्या इतक्या तीव्र असतात की हात उचलताही येत नाही. त्यातील त्राण गेल्याची भावना येते. का जाणवते ही समस्या?

अनेकांना वारंवार हातांना आणि पायांना मुंग्या येतात. इतकंच नाही तर काही वेळा उभे राहिल्यानंतर बोटांमध्ये मुंग्या यायला सुरूवात होते. जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे विशेषत: 'व्हिटॅमिन बी १२'च्या कमतरतेने ही समस्या निर्माण होऊ शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या व्हिटॅमिनच्या कमरतेमुळे न्यूरॉक्सच्या क्रियाकलापांवर परिणाम होतो तसेच मज्ञातंतूंच्या कार्यपद्धतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊ शकतो.



व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे अनेक प्रकारांच्या नूरोलॉजीकल समस्या उद्भवतात. उदाहरणार्थ, पायांमध्ये पॅरेस्थेसिया, स्नायूंना क्रॅम्प येणे, चक्कर येणे, गोंधळणे, थकवा आणि नैराश्य यांसारख्या समस्या दिसतात. त्याचं सर्वात मोठं कार्य मज्ञातंतूला जोडणे आह. यामुळे, स्नायू कमकुवत होऊ शकतात. आणि नसांची शक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे नसांमध्ये मुंग्या येऊ लागतात. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करायची असेल, तर त्यासाठी आहारात काही पदार्थांचा समावेश करणं गरजेचं आहे. आहारात मांस, मासे, दूध, चीज, मशरूम, फळे आणि अंडी याचा समावेश करणे गरजेचे आहे. याबरोबरच धान्याची भरडही तुम्ही खाऊ शकता. अल्कोहोल, कॉफी, प्रक्रिया केले अन्न यांचं सेवन टाळावे. अनेक अहवालांमध्ये हेदेखील समोर आले आहे की, हात आणि पायांना मुंग्या येण्याचे कारण केवळ व्हिटॅमिन बी १२ नाही तर इतर अनेक जीवनसत्त्वांचा अभाव आहे. मात्र, काही लोकांना योग्य आहार मिळत नाही, म्हणून जीवनसत्त्वाची कमतरता भासते.

## फ्रीजमधील टोमॅटो खाताय?

टोमॅटो ही सर्व स्तरातील, सर्व कुटुंबातील बहुधा सर्वांची आवडती फळभाजी. टिकाऊपणाच्या दृष्टीनेही टोमॅटो उत्तम असतात. त्यामुळे बहुतेकांच्या फ्रीजमध्ये टोमॅटो हमखास दिसतात. वास्तविक, फ्रीजमधील भाज्या खाऊ नयेत असे अनेक अभ्यासक सांगताहेत. तशातच आता टोमॅटोंबाबतही एक माहिती समोर आली असून त्यानुसार फ्रीजमध्ये ठेवलेले टोमॅटो खाणे आरोग्यासाठी हितकारक ठरत नाहीत.

टोमॅटो फ्रीजमध्ये बराच काळ ताजे राहू शकतात आणि ते ठेवलेही जातात. पण, असे केल्याने आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. टोमॅटो फ्रीजमध्ये ठेवल्याने त्याचे गुणधर्म बदलतात. टोमॅटोमधील लाइकोपीन अँटीऑक्सिडंट लाल रंग देते. पण थंडीमुळे त्याचे 'ग्लायको आल्कलॉइड्स' मध्ये रूपांतर होते. याला 'टोमॅटिन ग्लायको आल्कलॉइड' देखील म्हणतात. हे आरोग्यासाठी खूप वाईट आहे. त्यामुळे टोमॅटो रेफ्रिजरेटरमध्ये ठेवून खाणे टाळावे. टोमॅटो फ्रीजमध्ये ठेवल्याने त्याची चव आणि वास दोन्ही बदलतात.



टोमॅटो फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यातील पडदा तुटतो, त्यामुळे टोमॅटो लवकर कुजतात.

रेफ्रिजरेटरमध्ये ठेवलेले टोमॅटो अपायकारक असू शकतात. फ्रीजमध्ये टोमॅटो ठेवल्याने 'टोमॅटिन ग्लायको आल्कलॉइड्स' तयार होतात, जे शरीरासाठी हानिकारक असतात. असे टोमॅटो खाल्ल्याने आतड्याला सूज, मळमळ, उलट्या आणि जुलाब होऊ शकतात. हे यकृत आणि मूत्रपिंडासाठी देखील खूप वाईट आहे. हे टाळण्याकरिता टोमॅटो फ्रीजमध्ये न ठेवता रूम टेम्परेचरला ठेवून वापरणे अधिक रास्त ठरते.

## स्वरभंगावर आयुर्वेदोपचार

स्वरयंत्रातील बिघाडामुळे अनेकदा आवाज, उच्चार बाधित होतात. घशामध्ये वेदना होतात. यामागच्या कारणांचा शोध जरुर घ्यावा, पण त्याहीपेक्षा योग्य उपचार वेळीच केल्यास आवाज पुन्हा पूर्ववत होण्यास मदत होते. गुरूकुल पारंपारिक उपचार : एलादिवटी एक दोन गोळ्या, दिवसातून तीन ते चार वेळा चघळून खाव्या. अस्सल वंशलोचनयुक्त सितोफलादिचूर्ण चांगल्या दर्जाच्या मध आणि तुपाबरोबर चाटण स्वरूपात घ्यावे. प्रवाळ आणि शृंगभस्म प्रत्येकी तीन गोळ्या, या दोन वेळा, सकाळ आणि संध्याकाळ वासापाकाबरोबर घ्याव्यात. फुफ्फुसात कफ आहे, पण कफ सहज सुटत नसेल आणि त्यामुळे कोरडा खोकला येत असेल तर कोरफ

डीचा गर खावा.
खोकला काढा दोन्ही जेवणानंतर
चार चमचे, समभाग पाण्याबरोबर घ्यावा.



रूक्ष व्यक्तींनी भरपूर मनुका चघळून खाव्यात. मधुमेहामुळे कोरडा खोकला असल्यास मधुमेहाचे उपचार अवश्य चालू ठेवावे. क्षय विकारात कोरडा खोकला असल्यास चौसष्ट पिंपळीचूर्ण नियमितपणे चाटण स्वरूपात किंवा दुधाबरोबर तारतम्याने घ्यावे. रसक्षय किंवा अति जागरणाने, धूम्रपाने, चहा पिऊन किंवा मद्यपानाने कोरडा खोकला असल्यास कोहळे वड्या कुष्मांडपाक आणि सोबत प्रवाळ भस्म घ्यावे. वासावलेह, उरःक्षत फुफ्फुस व्रणामुळे कोरडा खोकला असल्यास लाक्षादि किंवा द्राक्षादिघृत घ्यावे.

ग्रंथोक्त उपचार : कंटकार्यावलेह, सितोफलादिचूर्ण, द्राक्षावलेह, मौक्तिकभस्म, च्यवनप्राश, कुष्मांडकावलेह, वासावलेह.

विशेष दक्षता आणि विहार : मौन पाळणे हिताचे आहे, शक्यतो कमी बोलावे, रात्रीचे जागरण टाळावे. स्वरयंत्राचा क्षोभ होईल अशी हवा, पाणी, राहणी, आणि व्यसने टाळावी. खालच्या पट्टीत बोलावे.

पथ्य : कमी तेला तुपाचे, बिन मसाल्याचे, सात्त्विक जेवण जेवावे. गोड द्राक्षे, गाईचे दूध, मुगाचे वरण, सुकी चपाती, ज्वारीची भाकरी, पालेभाज्या, जुने तांदूळ.

कुपथ्य : तेलकट, तूपकट, चहा, कॉफी, कोल्ड्रिंकसारखी कृत्रिम पेये, फरसाण, मिठाई, बेकरीचे पदार्थ आणि शिळे अन्न.

रसायनचिकित्सा : सितोपलादिचूर्ण, द्राक्षावलेह, एलादिवटी.

योग आणि व्यायाम : दीर्घश्वसन आणि प्राणामाम. भरपूर विश्रांती.

रूग्णालयीन उपचार : मीठ, हळद आणि गरम पाणी, किंवा तूप आणि गरम पाणी यांच्या तारतम्याने गुळण्या .

अन्य षष्ठि उपक्रम (पंचकर्मादि) : कफ मोकळा होत नसल्यास रोगी बलवानन असल्यास वमन कर्म.

चिकित्साकाल : दोन ते सात दिवस.

निसर्गोपचार : उकडलेले अन्न माफक जेवण, सायंकाळी लवकर जेवावे. किंवा लंघन करावे.

अपुनर्भवचिकित्सा : भरपूर मनुका खाव्यात, राजयक्ष्मा विकारात प्रवाळ आणि मौक्तिकभस्म वापरावे.

संकीर्ण : रोगाच्या इतिहासात मधुमेह, राजयक्ष्मा यांचा विचार तसेच शिक्षक, वक्ते, वकील यांच्या नेहमीच्या दिनचर्येकडे लक्ष असावे.

**– वैद्य विनायक खडीवाले**



'मला माझा फलंदाजीचा क्रम सांगण्यात आला आहे, परंतु मला हेही सांगितले आहे की, तो कुणाला सांगू नकोस. त्यामुळे तुम्हाला आणखी एक दिवस वाट पाहावी लागेल किंवा जेव्हा कर्णधार रोहित शर्मा उद्या पत्रकार परिषदेत येईल, तेव्हा उत्तर मिळेल.' — के.एल.राहुल

आचरेकर सरांनी आम्हाला केवळ क्रिकेटचे तंत्र आणि मंत्रच शिकवले नाही, पण त्यांच्या प्रत्येक कृतीतून आम्हाला इतर सर्व गोष्टींचा बोध मिळत गेला. प्रत्येक गोष्टीचे महत्त्व त्यांनी आम्हाला शिकवले. — सचिन तेंडुलकर



### चॅम्प्स करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत

# योगेश इलेव्हनला विजेतपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत हर्षल पवार (२४ व २-१३) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने बार्शी तालुका क्रिकेट अकादमी संघाचा २७ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले.

धायरी येथील स्टार स्पोर्टस मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत योगेश इलेव्हन संघाने प्रथम फलंदाजी करताना २४.३ षटकात सर्व बाद १३९ धावा केल्या. यात हर्षल पवार २४, शिवम पिंपळे २१, अथर्व वाशिवळे २० यांनी छोटी पण महत्वपूर्ण खेळी करत संघाच्या डावाला आकार दिला. बार्शी तालुका क्रिकेट अकादमीकडून विनायक मनगडे(३-१९), कृष्णराज देशमुख(२-१६), यज्ञेश झालटे(२-२९), प्रथमेश इंगोळे(२-३४) यांनी सुरेख गोलंदाजी केली. याच्या उत्तरात बार्शी तालुका क्रिकेट अकादमी संघाला २५ षटकात ९ बाद ११२ धावाच करता आल्या.



**निकाल: अंतिम फेरी:**

● योगेश इलेव्हन: २४.३ षटकात सर्व बाद १३९ धावा(हर्षल पवार २४, शिवम पिंपळे २१, अथर्व वाशिवळे २०, विनायक मनगडे ३-१९, कृष्णराज देशमुख २-१६, यज्ञेश झालटे २-२९, प्रथमेश इंगोळे २-३४) वि.वि. बार्शी तालुका क्रिकेट अकादमी: २५ षटकात ९ बाद ११२ धावा(कृष्णराज देशमुख नाबाद १६, प्रतिमेश डोईफोडे १५, प्रज्वल गावडे १३, यज्ञेश झालटे १३, पार्थ रांका ३-२०, शिवराज घाटे २-८, हर्षल पवार २-१३, अर्णव घाटे २-१४); सामनावीर - हर्षल पवार; योगेश इलेव्हन संघ २७ धावांनी विजयी.

## पवन सिंह सलग चौथ्यांदा आंतरराष्ट्रीय समितीवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** इंटरनॅशनल शुटींग स्पोर्ट्स फेडरेशन अर्थात आयएसएसएफच्या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पंच समिती (जजेस कमिटी) वर पुण्यातील पवन सिंह यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली आहे. या समितीचे एकमेव भारतीय सदस्य असण्यासोबतच सिंह हे जागतिक नेमबाजी प्रशासनाच्या सर्वोच्च पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करणारे एकमेव भारतीय ठरले आहेत.

आयएसएसएफच्या पंच समितीच्या वतीने नेमबाजी स्पर्धांच्या नियमांची समान अंमलबजावणी करणे, पंच व परीक्षक (ज्युरी) सदस्यांसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम आयोजित करणे आणि पंचांच्या परवानग्यांच्या मंजुरीवर देखरेख ठेवण्याचे काम केले जाते. या समितीत एकूण सात सदस्य आहेत. यापैकी पवन सिंग, चीनचे लॅन हँग आणि इटलीचे निकोला हे तीनच सदस्य यंदा निवडून आले असून रोममध्ये नुकत्याच झालेल्या आयएसएसएफच्या निवडणुकीदरम्यान उरलेल्या चार नवीन सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

पवन सिंह हे भारतातील एक अनुभवी नेमबाजी प्रशिक्षक असून त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक नेमबाजीचे चित्र बदलविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. सिंह हे भारतीय राष्ट्रीय रायफल संघटनेचे (एनआरएआय) सहसचिव आणि गगन नारंग यांच्या गन फॉर ग्लोरी अकादमीचे सहसंचालक देखील आहेत. आयएसएसएफ पंचांच्या समितीवर सिंह यांची निवड झाल्याने त्यांचे कौशल्य आणि नेमबाजी खेळातील त्यांचे योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## पुणेरी पलटणची घरच्या मैदानावर निराशा



**पुणे :** अजित चौहानच्या उत्तरार्धातील तुफानी चढाया आणि सुनीलकुमार, सोमवीरच्या भक्कम बचावाच्या जोरावर यू मुंबा संघाने प्रो कबड्डी लीगच्या यंदाच्या मोसमातील अखेरच्या टप्प्यात पुणेरी पलटण संघावर ४३-२९ असा सहज विजय साकारला. या विजयासह यू मुंबाने गुणतालिकेत तिसऱ्या क्रमांकांवर झेप घेतली. पुणे संघाकडून घरच्या मैदानावर निराशा झाली. मध्यंतराला मिळवलेली १९-१६ अशी आघाडी टिकवण्यात पुणेरी पलटण संघाला आलेले अपयश नक्कीच त्यांच्या संघ व्यवस्थापनाला चिंतेत टाकणारे ठरणार यात शंका नाही. उत्तरार्धात पुण्याचा स्थानिक खेळाडू अजित चौहाने चार चढाईतच पुणे संघाला निष्प्रभ केले. अजितच्या या चार चढाईतच यू मुंबा संघाने आत्मविश्वास मिळविला. उत्तरार्धात पहिल्या पाच मिनिटातच लोण स्वीकारावा लागल्यानंतर आलेल्या दडपणातून पुणे संघ बाहेर पडू शकला नाही. सामना संपताना आणखी एक लोण चढवत यू मुंबाने उत्तरार्धातील आक्रमक खेळाच्या जोरावर शानदार विजय मिळविला.

## गोव्याने महाराष्ट्राविरुद्ध मिळवला रोमहर्षक विजय

**नवी दिल्ली :** सुयश प्रभुदेसाईचे शानदार अर्धशतक आणि नंतर विकास सिंग याची आक्रमक फलंदाजी यामुळे सय्यद मुश्ताक अली करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेत गोव्याने महाराष्ट्रावर चार विकेट आणि तीन चेंडू राखून रोमहर्षक विजय नोंदविला. सलग चार सामने गमावल्यानंतर गोव्याने ई गटात पहिलाच विजय नोंदविला, महाराष्ट्राला पाच लढतीत तिसरा पराभव पत्करावा लागला. महाराष्ट्राने सहा बाद १९३ धावा केल्यानंतर गोव्याने १९.३ षटकांत सहा बाद १९४ धावा केल्या. गोव्याला विजयासाठी अखेरच्या दोन षटकांत ३५ धावांची गरज होती. आठ चेंडूंत २१ धावांची गरज असताना राजवर्धन हंगरगेकर याच्या गोलंदाजीवर दिव्यांग हिंगणेकर याच्याकरवी जम बसलेला सुयश झेलबाद झाला, मात्र नंतर डावखुऱ्या विकासने कमाल केली. अर्शिन कुलकर्णी याने टाकलेल्या अखेरच्या षटकात गोव्याला १६ धावांची गरज होती.



## यार्डी, मास्टरकार्ड संघाची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयडीयाज-अ-सास कंपनी यांच्या वतीने व कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड यांच्या सहकार्याने आयोजित १९व्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी कप क्रिकेटअजिंक्यपद स्पर्धेत साखळी फेरीत कॉग्निझंट संघाने दुसरा विजय तर, यार्डी, मास्टरकार्ड या संघांनी पहिला विजय मिळवला.

पीसीएमसी येथील व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ओमकार गायकवाड(२-२८ व २०) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर कॉग्निझंट संघाने टेक महिंद्रा संघाचा ४ गडी राखून पराभव केला.

दुसऱ्या सामन्यात सौरभ देवरे(१०१धावा) याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर यार्डी संघाने बॉश संघाचा ८२ धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली. पवन व्यास(२१ व ३-२१) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर मास्टरकार्ड संघाने सायबेज सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड संघाचा १७ धावांनी पराभव केला.





## सूर्या-शिवम आणि शार्दुल चमकले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे यांनी सय्यद मुश्ताक अली टी-२० ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी करत मुंबईच्या सर्व्हिसेसविरुद्धच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. हैदराबादमध्ये मुंबई आणि सर्व्हिसेस आमनेसामने आले होते, ज्यामध्ये सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेने दमदार फटकेबाजी केली. मात्र, आयपीएल २०२५ च्या लिलावात अनसोल्ड राहिलेल्या शार्दुल ठाकुरने चार विकेट्स घेतल्या. परंतु पृथ्वी शॉने पुन्हा निराश केली.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने लवकरच खाते न उघडता बाद झालेल्या पृथ्वी शॉच्या रुपाने पहिली विकेट गमावली. त्याचवेळी कर्णधार श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे यांनाही छाप पाडता आली नाही आणि दोघांनीही अनुक्रमे २० आणि २२ धावा केल्या.

## सेंट जोसेफ्स, सेंट अॅन्स स्कूल १४ वर्षांखालील गटाच्या उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संत तुकाराम, सेंट अॅनेस, जीआरपीएस (नारायणगाव), सेंट जोसेफ्स (पाषाण) स्कूल संघांनी फादर शॉच मेमोरियल आंतरशालेय हॉकी स्पर्धेत १४ वर्षांखालील मुली गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सामन्यांमध्ये, जीआरपीएस, नारायणगाव स्कूलने कर्नल भगत एचएसचा १-० असा पराभव केला. त्यात अनुष्का फुलसुंदरचा (५९ व्या) एकमेव गोल निर्णायक ठरला. दुसऱ्या लढतीत, भक्ती गिरी हिच्या (२०व्या) गोलच्या जोरावर संत तुकाराम एचएसने लोकमान्य टिळक एचएसला १-० अशा फरकाने हरवले. गटात पहिले दोन स्थान मिळवत दोन्ही संघांनी आगेकूच केली.



यापूर्वी, सेंट जोसेफ्स, पाषाण संघाने लागोपाठ दोन सामने जिंकले. त्यांनी प्रथम न्यू मिलेनियमला २-१ असे पराभूत केले. विजयी संघातर्फे अनन्या निम्हण (५व्या) आणि कॅलिन नेसामानीने (४९व्या) गोल केले. पराभूत न्यू मिलेनियम स्कूलकडून रक्षा चोटालिया हिला (५८व्या) गोल करता आला.

त्यानंतर, सेंट जोसेफ्सने जनता एचएसवर ६-० असा एकतर्फी विजय मिळवला. अनन्या निम्हणचे (१७वा, ५९वा) आणि रिदम कुरकुरेचे (२०वा, ३०वा) दोन तसेच कॅलिन नेसामनी (७वा) आणि सावनी गायकवाडचा (४५वा) प्रत्येकी एक गोल त्यांच्या मोठ्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

आणखी एका सामन्यात, सेंट अॅन्सने अँग्लो उर्दू गर्ल्स 'ब' विरुद्ध ३-० असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यात अनन्या थोपटे (२रा); दिव्याना तिलोकरी (४था) आणि स्वरांजली माने (२६वी) यांचे गोल महत्त्वपूर्ण ठरले.

## ग्रामीण भागातून दर्जेदार कुस्तीगीर घडावेत-नटवर जावळकर



**पुणे :** खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात संस्थास्तरीय क्रीडा महोत्सवांतर्गत गटपातळीवरील कुस्ती स्पर्धेचे उदघाटन करताना जेष्ठ उद्योजक पै.नटवर वसंत जावळकर म्हणाले ग्रामीण भागातून दर्जेदार कुस्तीगीर तयार व्हावेत यासाठी शालेय पातळीवरील कुस्ती स्पर्धा महत्वपूर्ण आहेत.अशा स्पर्धातून पैलवानांना आपली क्षमता सिद्ध करता येते.यशस्वी गुणवंत कुस्तीगीरांना पारितोषिके नटवर जावळकर यांनी उपलब्ध करून दिली. गटस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन संस्थेचे क्रीडा प्रमुख शाम भोसले यांचे मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक सुभाष देशमुख यांचे नेतृत्वाखाली क्रीडा शिक्षक शशिकांत जाधव व भीमराव आदलिंग यांनी केले. संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे प्रयत्नातून खानापूर विद्यालयाला कुस्ती मॅट मिळाल्याने भविष्यात दर्जेदार कुस्तीगीर तयार होतील असे सर्व मान्यवरांनी भावना व्यक्त केल्या.खानापूर,शिवणे,उत्तमनगर,पानशेत,डोणजे तसेच कोंडगाव-खामगाव येथील मुले व मुली कुस्तीपटूंनी विविध वजनी गटात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.पंच म्हणून पै.रामदास जावळकर व पै.संतोष जावळकर यांनी कामकाज पाहिले.प्रमुख पाहुणे म्हणून रघुनाथ यादव,अंकुश इंगुळकर,शीतल ठेंबे(उपनिरीक्षक हवेली ग्रामीण पोलीस स्टेशन),निशांत शिळीमकर (कोच कात्रज कुस्ती संकुल),पै.अभिषेक गडदे (आंतर विद्यापीठ राज्यस्तरीय कुस्ती सुवर्ण पदक विजेता),गीता राऊत (मुख्याध्यापक डोणजे),योगेश जावळकर उपस्थित होते.

क्रीडा शिक्षक शांताराम किवळे,संतोष जगताप,विकास मुजुमले या क्रीडा शिक्षकांनी सहकार्य केले.मुख्याध्यापक सुभाष देशमुख यांनी सर्वांचे स्वागत केले.प्रास्ताविक क्रीडा शिक्षक शशिकांत जाधव यांनी केले.निवेदन भगवान मदने व आभार क्रीडा शिक्षक भीमराव आदलिंग यांनी मानले.

## सुफियानची कमाल! मोडला पाकिस्तानचा सर्वात मोठा विक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेट कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या यजमानपदासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड सतत चर्चेत आहे. दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट संघाकडून दमदार कामगिरी पाहायला मिळत आहे. वास्तविक, पाकिस्तान क्रिकेट संघ सध्या झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे आणि एकदिवसीय मालिका जिंकल्यानंतर टी-२० मालिका खेळण्यात व्यस्त आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने झिम्बाब्वेवर ऐतिहासिक विजय मिळवला.



या विजयात सुफियान मुकीमने महत्त्वाची भूमिका बजावत इतिहास घडवला आहे.

पाकिस्तानने दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. पाकिस्तानी गोलंदाजांसमोर झिम्बाब्वे संघाला शरणागती पत्करावी लागली. झिम्बाब्वेच्या खराब फलंदाजीचा अंदाज यावरून लावता येतो की संघ पूर्ण २० षटकेही खेळू शकला नाही आणि केवळ १२.४ षटकांत ५७ धावांवर गारद झाला. झिम्बाब्वेचा हा टी-२० मधील सर्वात कमी धावसंख्या आहे. या वर्षाच्या सुरुवातीला झिम्बाब्वेने श्रीलंकेविरुद्ध ८२ धावा केल्या होत्या, मात्र वर्षाच्या अखेरीस हा लज्जास्पद विक्रमही मोडीत निघाला.

संपूर्ण झिम्बाब्वे संघाला इतक्या कमी धावसंख्येपर्यंत रोखण्यात फिरकी गोलंदाज सुफियान मुकीमचा मोठा वाटा होता. २५ वर्षीय सुफियानने एकट्याने अर्ध्या संघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

## जैस्वाल प्रियांशूला सुवर्णपदक

**मुंबई :** मुंबईतील SFA चॅम्पियनशिप २०२४ मध्ये दुसऱ्या दिवशी अॅथलेटिक्समध्ये रोमांचक खेळ पाहायला मिळाला. मुलांच्या १६ वर्षांखालील गटातील २००० मीटर स्पर्धेत, जिंदाल विद्या मंदिर वासिंग येथील जैस्वाल प्रियांशूने ८:३१ च्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले. त्याच्यापाठोपाठ असित प्रल्हाद्री कागदी संस्थेच्या जमादार विराजने ९:३६.८६ वेळेसह रौप्य पदक मिळवले.


SFA चॅम्पियनशिप २०२४ सातव्या आवृत्तीसाठी मुंबईत २७ क्रीडा प्रकारांचा थरार घेऊन आला आहे. मंगळवार, शहरातील चॅम्पियनशिपचा दुसरा दिवस, कॅरम, बुद्धिबळ, अॅथलेटिक्स आणि टेनिसच्या सुरुवातीचा साक्षीदार होता आणि पुढील काही दिवसांमध्ये पुढील कार्यक्रम होणार आहेत.

## किंग्स, परमार ऑल स्टार्स संघांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुना क्लब लिमिटेड आयोजित व मनिषा कन्स्ट्रकशन प्रायोजित तिसऱ्या पीसीबीएसएल(पुना क्लब बिलियर्ड्स अँड स्नूकर लीग) स्पर्धेत साखळी फेरीत किंग्स, परमार ऑल स्टार्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

पुना क्लब स्नूकर हॉल येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत किंग्स संघाने मनिषा रॉयल्स संघाचा ३-२ असा कडवा प्रतिकार करत विजय मिळवला. विजयी संघाकडून दिनेश महतानी, क्रिश रघानी, माधव क्षीरसागर, सुनील आशेर यांनी सुरेख खेळी केली.





## 'मी १० वर्षांपासून धोनीशी बोलत नाही : हरभजन सिंग

**नवी दिल्ली :** एकेकाळी कर्णधार एमएस धोनीचे मैदानावरील सर्वात मोठे हत्यार हरभजन सिंग होते. ऑफस्पिनर हरभजनने टीम इंडियाला अनेक सामने जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. हरभजन सिंग बराच काळ धोनीच्या नेतृत्वाखाली खेळला आहे. भज्जी आणि धोनी २००७ टी-२० वर्ल्ड कप आणि २०११ वनडे वर्ल्ड कपमध्ये एकत्र खेळले होते. त्यानंतर दोन्ही खेळाडू चेन्नई सुपर किंग्जमध्ये एकत्र खेळले. मात्र, आता भज्जीने मोठा खुलासा केला आहे. हरभजनने सांगितले की, गेल्या १० वर्षांपासून तो एमएस धोनीशी बोलला नाही.

### १५ वर्षांनंतर कसोटीत चारली धूळ

# बांगलादेशचा वेस्ट इंडिजमध्ये ऐतिहासिक विजय!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वेस्ट इंडिज संघाने घरच्या मैदानावर बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेची सुरुवात अतिशय चांगल्या पद्धतीने केली होती, ज्यामध्ये त्यांनी पहिला सामना २०१ धावांनी जिंकला होता. जमैकाच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात बांगलादेश संघाने मोठा उलटफेर केला आणि १०१ धावांनी विजय मिळवत मालिकेत १-१ अशी बरोबरीत राखली. बांगलादेशचा कॅरेबियन



बेटांवरचा तिसरा विजय आहे.

या सामन्यात बांगलादेशने वेस्ट इंडिज संघासमोर २८७ धावांचे लक्ष्य होते, परंतु त्यांना केवळ १८५ धावाच करता आल्या. डावखुरा फिरकीपटू तैजुल इस्लामने बांगलादेश संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली, ज्याने सामन्याच्या शेवटच्या डावात १७ षटकांत ५० धावा देत विंडीजचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये पाठवला. जमैका येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यापूर्वी, बांगलादेश संघाने २००९ मध्ये त्यांच्या घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजचा शेवटचा पराभव केला होता. ग्रेनेडाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात बांगलादेश संघाने ४ गडी राखून विजय मिळवला होता. आता १५ वर्षांनंतर वेस्ट इंडिजला त्यांच्याच घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात पराभूत करण्यात त्यांना यश आले आहे. या सामन्यात बांगलादेश संघ प्रथम फलंदाजी करताना केवळ १६४ धावांत गारद झाला होता, त्यानंतर त्यांच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत वेस्ट इंडिजचा पहिला डाव केवळ १४६ धावांत गुंडाळला. बांगलादेशने दुसऱ्या डावात २६८ धावा केल्या, ज्यात झाकेर अलीची ९१ धावांची उत्कृष्ट खेळी पाहायला मिळाली. या सामन्यातील वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावाबद्दल बोलायचे झाले तर केवळ केव्हम हॉजलाच अर्धशतक करता आले.

## हरभजन सिंगच्या बायोपिकमध्ये विकी कौशल झळकणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बॉलीवूडमध्ये खेळाडूंवर आधारित बायोपिक नेहमीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात. याच श्रेणीत आणखी एका स्पोर्ट्स बायोपिकची घोषणा होण्याची शक्यता आहे. प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत आपल्या जीवनावर आधारित बायोपिकबाबत उघडपणे चर्चा केली. या बायोपिकमध्ये आपल्या भूमिका साकारण्यासाठी त्याने विकी कौशलला योग्य उमेदवार मानले आहे.



हरभजन सिंग, ज्याला त्याचे चाहते प्रेमाने 'भज्जी' म्हणतात, हा भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक यशस्वी फिरकी गोलंदाज आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने बायोपिकच्या चर्चांना दुजोरा देत सांगितले की, त्याच्या जीवन प्रवासावर आधारित चित्रपट बनवण्याचा तो विचार करत आहे. मात्र, त्याने अद्याप या प्रकल्पासाठी कोणतीही निश्चित कालमर्यादा जाहीर केलेली नाही. हरभजन म्हणाला, "माझ्या जीवनातील एक-दोन कथा अशा आहेत ज्या मी जगासमोर आणू इच्छितो. लवकरच त्याबाबत घोषणा करेन."

जेव्हा त्याला विचारण्यात आले की बायोपिकमध्ये मुख्य भूमिका कोण साकारू शकेल, तेव्हा हरभजनने विकी कौशलचे नाव घेतले. विकीला त्याने "नंबर वन" म्हणत त्याच्याबद्दलचा आदर व्यक्त केला. विकी कौशल आपल्या सरदार उधम सिंग आणि सॅम माणेकशॉ यांसारख्या ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारण्यासाठी ओळखला जातो.

• पंढरपूर • गुरुवार, ५ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - १९५

